HAKARA

हाकारा

वर्ष : एकविसावे • अंक दुसरा
एप्रिल – जून २०००

स्त्रिया आणि आरोग्य

THE MAHARASHTRA ASSOCIATION OF ANTHROPOLOGICAL SCIENCES

२५

रौप्य महोत्सवी वर्ष

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

कार्यकारी मंडळ

अध्यक्ष	:	प्रा. रा. के. मुटाटकर
उपाध्यक्ष	:	डॉ. विजय भानू
मुख्य सचिव	:	डॉ. सुधाकर मोराणकर
सह सचिव	:	पुरूषोत्तम आगाशे
खजिनदार	:	जयवंत मंत्री
सभासद	:	ॲड. पदमाकर वळवी (आमदार)
		डॉ. मिलिंद बोकील
		सुधीर जोग
		गणपत पंडित
		आरती कौलगेकर
		सुमेध गुर्जर

दलित, आदिवासी, भटक्या-विमुक्त जाती, इतर अकिंचन कष्टकरी वर्ग आणि स्त्रिया यांच्या शोषणमुक्तीसाठी जर कुठे लोकशाहीच्या तत्त्वावर चळवळ संघटित होत असेल तर तिला पाठिंबा देणे, तिच्याशी आपल्या विचारांचा अनुबंध राखणे हे मी माझे कर्तव्य समजतो. प्रबोधनाची हीच खरी योग्य दिशा आहे, असे मला वाटते.

गं. बा. सरदार

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

हाकारा (त्रैमासिक)

वर्ष : एकविसावे • एप्रिल - जून २००० • अंक : दुसरा

संकल्पना / प्रेरणा

प्रा. गं. बा. सरदार

संपादक - मुद्रक - प्रकाशक

रामचंद्र मुटाटकर

कार्यकारी संपादक

ग. शां. पंडित

संपादक मंडळ

मिलिंद बोकील
सुधीर जोग
श्रीनिवास इंदापूरकर
पुरुषोत्तम आगाशे

अक्षरजुळणी

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे

मुद्रण स्थळ

असाईन सिस्टिम्स्, पुणे - ३०
फोन - ४३३ ०१६२

मुखपृष्ठ छायाचित्र

विजय भानू

प्रकाशन व पत्रव्यवहाराचा पत्ता :

६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७
फोन/फॅक्स : (०२०) ५८८७२१९

अंकाचे मूल्य : रु. २०/-

अनुक्रम

संपादकीय

• पुस्तक परिचय

कानोसा
रा. के. मुटाटकर ०३

एका शापाची जन्मकथा
आरती केळकर-खांबेटे ०५

दिशा
रोहिणी लेले ०७

पण लक्षात कोण घेतो ?
आरती कौलगेकर १२

• क्षयविषयक सामाजिक दृष्टिकोन
सुधाकर मोराणकर, निशी सुर्यवंशी १९

• आरोग्यविषयक प्रकल्प, वेल्हे
शिल्पा खळदकर २३

• आरोग्य मार्गदर्शकांचे अनुभव ३४

अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी किंवा मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अंशत: अनुदान दिले असले तरी नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

संपादकीय

'**हाकारा**' चा या वर्षातला हा दुसरा अंक प्रामुख्याने 'स्त्री-आरोग्य' या विषयाशी संबंधित आहे. 'आरोग्य' म्हटलं की आपल्या डोळ्यापुढे इंजेक्शन, सलाईन, गोळ्या, औषधे हे चित्र उभे राहते. परंतु केवळ उपचार म्हणजे आरोग्य नाही, हे आपण लक्षात घ्यायला पाहिजे. याबाबतीत बर्ट्रोल्ड ब्रेख्त या कवीची एक सुंदर कविता आपल्या विचारांना चालना देते. ही कविता म्हणजे 'एका आजारी माणसानं डॉक्टरांना लिहिलेलं एक पत्र' आहे. हा आजारी माणूस म्हणतो - 'माझ्या रोगाचं खरं कारण मला माहिती आहे, पण ते कोणी ओठावर आणत नाही एवढंच. आणि ते कारण आहे 'गरिबी!' वरवर पाहता हे कारण आपल्याला खरंही वाटेल व पटेलही. पण आपण गरीब का आहोत याची कारणं शोधायला गेलो तर अशिक्षितपणा, अज्ञान, अंधश्रध्दा, लोकसंख्यावाढ, आळस, अपुरं उत्पादन, नापीक जमीन, उद्योगधंद्यांचा अभाव अशी अनेक कारणे दिली जातात, पण ही कारणं खरी नाहीत. खरे कारण आहे विषमता, असमानता ! सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक इत्यादी सर्व क्षेत्रात ती दिसून येते. गरिबी आणि विकास - या दोन परस्पर विरोधी गोष्टी. या दोहोंचा योग्य मेळ घातला न गेल्यामुळेच आज समाजात विषमता वाढत चाललेली दिसते, मग ती शेतीच्या बाबतीत असो, शिक्षणाच्या असो अथवा आरोग्याच्या. दूरवरच्या, दुर्लक्षित गावातल्या गरिबातल्या गरीब माणसाला परवडू शकेल, सहज उपलब्ध होऊ शकेल अशी स्वस्त आरोग्य सेवा मिळवून देणं, संपूर्ण समाजाचं आरोग्य सुधारणं म्हणजे खरंतर 'विकास.' पण हे सर्व साध्य करण्यासाठी लोकांमध्ये जागृती येणं आवश्यक आहे. अशाच प्रकारचं आरोग्य विषयक लोकजागृतीचं काम महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेनं एका प्रकल्पाच्या निमित्तानं पुणे जिल्ह्यातल्या अति दुर्गम, दुर्लक्षित अशा वेल्हे तालुक्यात सुरु केलेलं आहे. भारत सरकारच्या 'प्रजनन आणि बाल आरोग्य' प्रकल्पांतर्गत ग्रामीण भागातील स्त्रियांच्या व मुलांच्या आरोग्याविषयी लोकांमध्ये जाणीव जागृती घडवून आणण्यासाठी संस्थेतर्फे जो प्रयत्न केला जात आहे, त्यात प्रथम तेथील स्थानिक लोकांचा विश्वास संपादन करणं, त्यांचा सहभाग मिळवणं आवश्यक होतं. यासाठी त्या लोकांमध्ये मिसळून त्यांच्याशी मनमोकळेपणानं बोलून, त्यांचे विचार जाणून घेणं गरजेचं आहे ही तत्त्वप्रणाली संस्थेने अंगिकारलेली आहे. आणि त्यामुळेच, आज स्थानिक लोकांचा उस्फूर्त सहभाग दिसून येऊ लागला आहे. या अंकात प्रत्येक गावातील आरोग्य मार्गदर्शकाने स्वतःच्या व संस्थेच्या कार्याबाबत अगदी निःसंकोचपणे आपले मनोगत व्यक्त केले आहे. त्यातून त्यांच्या उत्स्फूर्त सहभागाची कल्पना येते. आरोग्याचा कार्यक्रम 'राबविण्यापेक्षा' लोकांमध्ये 'आरोग्य संवाद' घडवून आणणे गरजेचं आहे व त्यासाठी वेल्हे तालुक्यातील १४ गावांमधून आरोग्य मार्गदर्शक घेण्याचे ठरले. संबंधित गावांमध्ये मिटींग घेतली तेव्हा ग्रामस्थांनीच आपल्या गावातील स्त्री व पुरुष आरोग्य मार्गदर्शक सुचविले. गावाने आपली निवड केली हा आनंद त्यांना होताच, त्याचबरोबर त्यांच्या व्यावहारिक अनुभवांना प्रशिक्षणाची जोड दिल्याने त्यांच्या विचारातही बदल घडून आला आहे व त्यामुळे संस्थेच्या कामातही ते लवकरच समरस झालेले आहेत. हा प्रकल्प स्त्रिया व मुलांच्या आरोग्याबाबत असतानाही यात पुरुषांचा सहभाग कशासाठी ? असा प्रश्न पडू शकतो; परंतु प्रजननाविषयीची जागरुकता केवळ स्त्रियांना असणे महत्त्वाचे नसून उलट पुरुषांनाच अधिक असणे आवश्यक आहे. आतापर्यंत इतर कार्यक्रमांमध्ये स्त्रीचा 'स्त्री' म्हणून विचार केला गेला नाही, तो होणे गरजेचे आहे हा दृष्टिकोन ठेवूनच संस्थेने या प्रकल्पात स्त्री व पुरुष या दोघांचाही सारखाच सहभाग ठेवला आहे.

या अंकाचा विषय 'स्त्री आणि आरोग्य' असला तरी यात स्त्रियांच्या आजारांची व त्यावरील उपचारांची माहिती आलेली नाही, तर स्त्रियांच्या मासिक पाळी, बाळंतपण, लैंगिक, वैधव्य आदी समस्यांबाबत संबंधित विषयाच्या पुस्तक परिचयातून माहिती देण्याचा व आरोग्यविषयक जिज्ञासा निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. व्यक्तीच्या शरीराला शारीरिक आजार तर होतातच; परंतु त्याच बरोबर मानसिक व सामाजिक आजारही असतात हेच सांगण्याचा हा प्रयत्न आहे.

अंकातील विचार आपणास पटतील अशी आशा आहे. आपले अभिप्राय जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

पुस्तक परिचय

कानोसा

ग्रामीण स्त्रीच्या शरीर व मनातील गुपितांचा

रा. के. मुटाटकर

गडचिरोली जिल्ह्यात 'सर्च' नावाची स्वयंसेवी संघटना चालविणाऱ्या स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. राणी बंग यांनी तेथील ग्रामीण स्त्रियांशी अनौपचारिक पध्दतीने वार्तालाप करून त्याची माहिती या पुस्तकात दिली आहे. समाजशास्त्रांतर्गत या पुस्तकाचे स्वरूप स्त्रियांच्या गटागटात मुलाखती घेऊन त्याचे शोध-निष्कर्ष संख्यात्मक व गुणात्मक पध्दतीने मांडले आहेत.

दोन गावातील स्त्री-रोगांच्या अध्ययनासाठी संशोधन करीत असताना स्त्रियांच्या मनोविश्व व समाजविश्वाची चुणूक जाणवली. ते विश्व डॉक्टर म्हणून व स्त्री म्हणून समजून घेण्याचे कुतुहल निर्माण झाले. त्यातून हे समाजशास्त्रीय संशोधन उदयास आले. सर्वसाधारणतः ५० विषयांवर, १०० सुईणी, २०० स्त्री-रूग्ण, ३० पुरूष, स्त्रियांचे अनेक गट अशा जवळपास ६०० जणांशी डॉ. राणी बंग यांनी मुलाखतवजा गप्पा मारल्या व त्याची व्यवस्थित टिपणे तयार केली. साधारण ८५ टक्के स्त्रिया बिगरआदिवासी व १५ टक्के आदिवासी होत्या. ८५-९० टक्के स्त्रिया निरक्षर होत्या.

निरक्षर लोकांमध्ये नाजूक विषयांबाबत कसे संशोधन करावयाचे, कशी माहिती घ्यावयाची याचे 'कानोसा' हे उत्कृष्ट उदाहरण आहे. अर्थात राणी बंग यांचे डॉक्टर म्हणून स्त्रियांशी जवळीकीचे संबंध होते. तसेच कोणते प्रश्न विचारावयाचे याची पूर्व-तयारी त्यांनी काही प्रमुख माहितगार सुईणींशी चर्चा करून ठरविले होते. तसेच प्रजननासंबंधी स्त्रिया काय शब्द वापरतात हेही उमजून घेतले होते. डॉक्टरकडे तपासणीसाठी जाण्यापूर्वी गुप्तांगांवरचे केस स्वच्छ करावयाचे पथ्य स्त्रिया पाळत असत, हे डॉक्टर म्हणून काम करत असताना त्यांच्या लक्षात आले. स्त्रियांच्या वागणुकीचे संदर्भ त्यांना समजून घ्यावयाचे होते. अडाणी, बेअकली ही सुशिक्षित लोकांच्या मनातील झुरळं झटकल्यामुळे संशोधनाकरिता आवश्यक असणारा वस्तुनिष्ठ संवाद त्यांना साधता आला.

स्त्री-आरोग्यासंबंधी साधारण ५० विषयांची उकल २५० पृष्ठांत मांडली आहे. यात वंध्यत्व, पांढरे पाणी, स्त्री-पुरूष संबंध, पहिला संबंध, स्त्री-पुरूषांच्या अंगावरील केस, मासिक पाळी, गरोदरपण व त्याविषयीच्या समस्या, आहार, लहान लेकरू-त्याचा जन्म, वार; स्तन व स्तनपान, अंग बाहेर येणे, कर्करोग इत्यादी विषयांचा ऊहापोह चर्चा स्वरूपात दिलेला आहे.

स्त्रियांनी आपल्या आरोग्याविषयी जसे प्रदर किंवा पांढरे पाणी जाणे - अनेक कारणे दिली आहेत. त्यांपैकी काहींना आयुर्वेदात आधार असण्याची शक्यता आहे. या बाबींकडे आधुनिक वैद्यकाच्या दृष्टिकोनातून बघितल्यास खुळचटपणा किंवा अज्ञान व अंधश्रध्दा या सदरात त्या मोडतील. इतक्या मोठ्या प्रमाणावर समुदायातील स्त्रिया असे का म्हणतात

हे समजून घेणे अगत्याचे आहे. त्याशिवाय आरोग्यशिक्षणाच्या प्रयत्नांना यश येणार नाही. समुदायाचा सहभाग हवा असेल तर त्यांचे विचार-आचार त्यांच्या दृष्टिकोनातून समजून घ्यावयास हवे.

प्रत्येक विषयाची चर्चा करीत असताना घरगुती औषधे, पथ्य-अपथ्य म्हणजे काय खावे, प्यावे व काय टाळावे याचाही ऊहापोह प्रत्येक भागात दिलेला आहे. तसेच, बीमारीचा स्त्री-पुरूष लैंगिक संबंधावर काय परिणाम होतो याविषयीही स्त्रियांनी मतप्रदर्शन केले आहे.

वंध्यत्वाबाबतच्या उदाहणात दोन स्त्रियांना त्यांच्या नवऱ्यांपासून मूल न झाल्याने एकीने दुसऱ्या पुरूषाशी संबंध करून गर्भधारणा करून घेतली व दुसरीने बलात्कारातून राहिलेला गर्भ वाढविला. नवरा नपुसंक आहे असा बोभाटा करेन असा दमही त्या बाईने नवऱ्यास दिला. या स्त्रिया बिगर आदिवासी की आदिवासी याबाबत उल्लेख नाही; परंतु त्या आदिवासी असण्याची शक्यता जास्त.

स्त्री-पुरूषांच्या अंगावरील केसांबाबत बरीच चर्चा आहे. जन्मतःच मुलीच्या अंगावरून वर (नाळ) फिरवल्यास केस येत नाहीत असा काही स्त्रियांचा अनुभव व समज आहे. पुरूषांच्या अंगावर केस हवेत असे स्त्रियांचे म्हणणे पडले. स्त्रिया गुप्तांगाच्या स्वच्छतेबाबत फार जागरूक आहेत. पारंपरिक पध्दतीनुसार राख लावून केस उपटण्याची पध्दत आहे. पुरूष आपले केस साफ करीत नाही असे स्त्रिया म्हणाल्या. विटाळाबाबतही विस्तृत चर्चा आहे. जास्त, कमी विटाळ, काळा विटाळ, विटाळ जाणे याबाबत स्त्रियांनी सखोल चर्चा केली, 'कमी विटाळ जाणे चांगले नाही, तो आजार आहे. विटाळ चांगला जाऊन साफ झाला पाहिजे.'

गर्भ मुलाचा का मुलीचा याबाबत स्त्रियांचे पारंपरिक अडाखे आहेत. 'पोरीच्या वेळी उजवा पाय फार दुखतो. बारसे झाल्यावर पायाचे दुखणे दुरूस्त होते.' 'मुलगा व्हायचा असल्यास जडपणा वाटतो. भात खावासा वाटत नाही. अन्नाचा वास चालत नाही. दही खाऊन राहतात. बाया आंबा बोरं व चिंचा खातात.' गरोदरपणातील एक पाय दुखण्याबाबत स्त्रियांनी बराच विचार केलेला दिसतो. गरोदरपणात काय खावे किंवा खाऊ नये याबाबत साधारण ५० उदाहरणे दिली आहेत. साधारण ५५ टक्के स्त्रिया म्हणाल्या की, 'गरोदर स्त्रीने कमी खावे. कारण जास्त अन्न पचत नाही. आई व मूल दोघांनाही हलकेपणा राहतो. बाळंतपणात पिंड स्वतः हालचाल करीत बाहेर येतो. पिंड रोड असला तरी त्याला हलकेपणात चपळाई नसते.' या कारणास्तव स्त्रिया लोहाच्या व कॅल्शियमच्या गोळ्या खात नाहीत. ३५ टक्के स्त्रिया म्हणाल्या की 'जास्त अन्न खावे, कारण दोन जीव पोसायचे असतात, बाईला ताकद पाहिजे, दूध जास्त यायला पाहिजे, गर्भ निरोगी राहिला पाहिजे.' बाळंतपणानंतरच्या जेवणाबाबतही साधारण ७५ गोष्टींची यादी दिली आहे. स्तनपानाबाबतही बऱ्याच खोलात चर्चा झाली आहे.

शेवटच्या अध्यायात गडचिरोली भागातल्या

(उर्वरित मजकूर पृष्ठ ११ वर पहा)

पुस्तक परिचय

'एका शापाची जन्मकथा'

मासिक पाळी : एक सामाजिक-सांस्कृतिक शोध

आरती केळकर-खांबेटे

मासिक पाळी हा स्त्रीचा नैसर्गिक धर्म आहे. कोणतीही नैसर्गिक घटना ही एका अर्थी कोरी असते. तिचा नीती - अनीतीशी संबंध नसतो. ती ननैतिक (a moral) असते. असे असूनही तिचे मूल्यांकन करून तिला चांगले किंवा वाईट ठरविणे हा मानवी व्यवहाराचा भाग झाला. चांगले वाईट, योग्य-अयोग्य या संकल्पना माणसाने निर्माण केलेल्या आहेत. आदिम काळापासून आजवर चालत आलेल्या जीवन व्यवहारात त्या प्रकट किंवा सुप्त रूपाने अस्तित्वात असतात.

सनातन काळापासून चालत आलेल्या रूढी, परंपरा, विधी व निषेध, धार्मिक बंधने यांच्यामुळे मासिक पाळीच्या जैविक प्रक्रियेकडे वेगळ्याच दृष्टिकोनातून पाहिले जाते. या दृष्टिकोनामागे मानसशास्त्रीय, मानववंश शास्त्रीय, सामाजिक, धार्मिक अशी अनेक गृहितके असतात. या गृहितकांचा शोध घेऊन अधिक मानवी (human) व शास्त्रीय भूमिकेतून नवा सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होणे आवश्यक आहे. अरूणा देशपांडे यांचे हे पुस्तक ही गरज बहुतांशी पूर्ण करते असे म्हणायला हरकत नाही.

या पुस्तकाच्या मांडणीमागे एक तार्किक व्यवस्था व विचार सादर करण्याची पध्दती (presentation) अनूस्यूत दिसते. पुस्तकाची सुरुवात विविध थरातील स्त्रियांच्या अनुभवातून, त्यांच्या खऱ्याखुऱ्या जिवंत अशा चर्चाक्षेमातून (discourse) आधार घेते. 'आम्हाला बोलायचं आहे' या अध्यायात मासिक पाळीच्या अनुभवाकडे आजची स्त्री कसे पाहते, काय पाहते याची पाहणी केली आहे. यासाठी मुलाखतींचा आधार घेतलेला आहे. विविध थरातील स्त्रियांची मानसिकता शेवटी मासिक पाळीला 'शाप' म्हणून स्वीकारते हे कटू सत्य जाणून घेण्यासाठी हा सर्व भाग मुळातूनच वाचला पाहिजे.

मासिक पाळी शाप का वाटते याची कारणमीमांसा करताना या शापाचे मूळ ज्या कथांतून व्यक्त होते त्यांचा मागोवा घेतला आहे. कथा, कादंबऱ्या, कविता इत्यादी साहित्यातले प्रकार नित्याच्या जीवनव्यवहाराचे प्रतीक असतात. जे जे घडत असते त्याचे चित्रण साहित्य, कला यांच्या माध्यमातून आविष्कृत होत असते; परंतु हा संबंध दोन्ही बाजूंनी असतो. लिखित, अलिखित अशा अनेक साहित्यिक परंपरा जीवन व्यवहाराला वळण देण्याचे, दिशा दाखविण्याचे कार्यही करीत असतात. जीवनव्यवहार व निर्माण होणारी तात्विक प्रणाली परस्परांवर अवलंबून असतात. कोणत्या जीवनव्यवहाराशी कोणती प्रणाली बध्द आहे हे पाहणे हे तात्विक उत्खननाचे (philosophical archeology) एक उदाहरण आहे. नीती -

अनीतीच्या कल्पना, स्त्रीने कोणत्या प्रसंगी कसे वागावे याविषयीचे नियम धर्मशास्त्रात येतात. कामशास्त्र, अर्थशास्त्र, धर्मशास्त्र व मोक्षशास्त्र या सनातन शास्त्रात स्त्रीविषयक दृष्टिकोनाचा एक समान दुवा सापडतो. एका बाजूला स्त्रीच्या फलनक्षमतेची शक्ती व पृथ्वीची सर्जनशीलता या एकाच शक्तीची दोन रूपे मानली आहेत. पर्यायाने स्त्रीला सृजनशक्तीचे प्रतीक मानले आहे. वेगवेगळ्या देवतांची पूजा म्हणजे मातृत्वाचा सत्कार होय. तर दुसऱ्या बाजूला याच शक्तींची भीती वाटल्याने स्त्रीची केलेली निंदा व तिच्यावर घातलेली कडक बंधने. स्त्रीकडे पाहण्याचा हा विरोधाभास सर्वदूर आहे. साहित्य, कला, धार्मिक रूढी या संस्कृतीच्या अंगोपांगात या दृष्टिकोनाचे प्रतिबिंब दिसते.

परंतु हा विचार एवढ्यापुरताच मर्यादित नाही. तथाकथित शास्त्रीय भाषा वापरणारे वैद्यकशास्त्र सुध्दा याला अपवाद नाही. वैद्यकशास्त्राचे चर्चाक्षेत्र सुध्दा पुरूषप्रधान संस्कृतीचीच भाषा वापरते. हिप्पोक्रीटस, गॅलन या पाश्चात्य डॉक्टरांच्या लेखनातही स्त्रीचे शरीर पुरूषाच्या शरीरापेक्षा कनिष्ठ व अपूर्ण मानले आहे. आयुर्वेदावरही पारंपरिक मूल्य व्यवस्थेचा पगडा दिसतो. गर्भाशयाचे वर्णन अतिशय नकारात्मक दृष्टिकोनातून केले जाते व त्याचा संबंध स्त्रीच्या मानसिकतेशी जोडला जातो. आजही वैद्यकीय भाषेत मासिक पाळीचा उल्लेख जणू आजार म्हणून केला जातो. वैद्यकिय चर्चाक्षेत्रात, मासिकात स्त्रीच्या देहाविषयी, देहधर्माविषयी जी भाषा वापरली जाते तिचे विश्लेषण करणे ही आजच्या काळाची गरज आहे. संस्कृतीच्या इतर कोणत्याही अंगापेक्षा शास्त्राला जास्त महत्त्व दिले जाते. ही तथाकथित शास्त्रेसुध्दा मूल्यांकन विरहित भाषा वापरू शकत नसतील तर आम्ही मध्ययुगीन संस्कारांतून मुक्त होण्यास तयार नाही, असे मानावे लागेल. यासाठी वैचारिक व व्यावहारिक या दोन्ही पातळ्यांवर पुनर्विचार, पुनर्लेखन झाले पाहिजे. स्त्री-डॉक्टरांचा सहभाग इथे मोलाचा ठरेल. स्त्री-आरोग्यविषयक धोरणातील त्रुटीकडे लक्ष देणे अगत्याचे ठरते. या धोरणात कुटुंबनियोजन व बालसंगोपन ही उद्दिष्टे मानून कुटुंबसुखाचा जणू हा एकमेव मार्ग आहे, असे भासविले जाते. कुपोषण, तीव्र ॲनिमिया, शारीरिक स्वच्छता व यासाठी आवश्यक असणाऱ्या सुविधा याकडे दुर्लक्ष केले जाते.

कौटुंबिक व सामाजिक जीवनात स्त्रीला व्यक्तिमत्व विकासाला वाव मिळत नाही. वैयक्तिक अवकाश (space) ही फारच दूरची कल्पना झाली; परंतु मानसिक असुरक्षितता, लैंगिक शिक्षणाविषयी पूर्णतः अज्ञान हे आजचे ज्वलंत प्रश्न आहेत. तरूण मुलींनी सुंदर दिसण्यापेक्षा आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी असा विचार समग्र शिक्षणपध्दतीमध्ये कुठेही येत नाही.

आज नव्या शिक्षणाने बुध्दीची कवाडे उघडल्यावर विज्ञानाच्या आधारे खंबीरपणे कालबाह्य रूढींना विरोध करणे आवश्यक आहे, असे लेखिका आवर्जून सांगतात. एक पाऊल पुढे जाऊन विज्ञानाचे क्षेत्रसुध्दा खऱ्या अर्थाने माणुसकीला पारखे होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. स्वच्छतागृहांची कमतरता, कुटुंबनियोजनाच्या

(उर्वरित मजकूर पृष्ठ ११ वर पहा)

दिशा

स्त्रियांच्या प्रजनन-आरोग्याविषयी माहिती व दृष्टिकोन देणारे पुस्तक

रोहिणी लेले

भोरे कमिटीच्या अहवालातील शिफारसींनुसार स्वतंत्र भारताच्या सरकारने जनतेला आरोग्यसेवा पुरवण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रांची सुविधा निर्माण केली. प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे यांच्यामार्फत तळगाळातील लोकांना आरोग्यसेवा पुरविण्याचे काम 'ऑक्झिलिअरी नर्स मिडवाईफ' (ए.एन.एम./आरोग्यसेविका) करतात. हे काम करताना त्यांना असंख्य अडचणींना तोंड द्यावे लागते. उदा. प्रशिक्षण व प्रत्यक्ष कामाचे स्वरूप यात संबंध नसणे, टार्गेट (उद्दिष्ट) पूर्ण करण्याचे दडपण, टार्गेट पूर्ण न झाल्यास पगार अडवून ठेवणे, औषधांचा अपुरा साठा, कुटुंबापासून दूर राहावे लागणे इ. असे असले तरी प्राथमिक आरोग्यसेवेतील सर्वात कार्यक्षम कर्मचारी त्याच आहेत. हे सर्व लक्षात घेऊन सामाजिक आरोग्य संशोधन संस्थेने (एफ.आर.सी.एच) स्वयंसिध्दा मालिकेअंतर्गत चार पुस्तकांचा एक संच प्रकाशित केला आहे. ए.एन.एम्सना आपली कौशल्ये वाढविण्यासाठी आणि अडचणींमधून मार्ग काढण्यासाठी उपयुक्त माहिती देणें हे या पुस्तकांचे उद्दिष्ट आहे. या पुस्तकांपैकी 'दिशा' या एका पुस्तकाचा हा परिचय.

ए.एन.एम्सचा सखोल अभ्यास सामाजिक आरोग्य संशोधन संस्थेने १९९० साली केला. दूरदूरच्या खेड्यापाड्यांमध्ये विखुरलेल्या ए.एन.एम्सना विविध विषयांची माहिती पुरविण्याची गरज आहे, हे या अभ्यासातून लक्षात आले; म्हणून संस्थेने त्यांच्यासाठी 'आयुषी' हे मासिक सुरू केले. हे मासिक महाराष्ट्र व मध्यप्रदेशातील एकूण १६,००० ए.एन.एम्स.पर्यंत पोहोचवले. ए.एन.एम्सच्या तांत्रिक ज्ञानात भर पडावी, आरोग्याशी निगडीत समस्या आणि वैयक्तिक समस्या यांच्या सामाजिक कारणांचे त्यांना आकलन होऊन त्यावर उपाय शोधता यावेत, आणि एकमेकींच्या अनुभवांचा उपयोग व्हावा ही 'आयुषी' ची उद्दिष्टे होती. 'आयुषी' च्या निमित्ताने संस्थेचे कार्यकर्ते एक हजार ए.एन.एम्सना भेटले. प्रत्यक्ष चर्चा करून आणि प्रश्नावलीमार्फत त्यांनी ए.एन.एम्सच्या अडचणी समजावून घेतल्या. १९९० सालच्या अभ्यासापासून 'आयुषी' पर्यंत झालेल्या दीर्घ प्रवासाच्या अनुभवावर आधारित असा 'स्वयंसिध्दा' हा चार पुस्तकांचा संच आहे. त्यापैकी 'दिशा' या पुस्तकात स्त्रियांचे प्रजनन-आरोग्य; 'दुवा' या पुस्तकात सर्वसामान्य आजारांची लक्षणे, निदान, उपचार व रूग्णाची पाठवणी/रेफरल; 'माध्यम' मध्ये आरोग्यशिक्षण व संवाद; आणि 'दृष्टी' मध्ये ए.एन.एम्सच्या जबाबदाऱ्या, प्रशासकीय कामकाज व नियम यांची माहिती दिली आहे.

ए.एन.एम्सना प्रशिक्षणक्रमात स्त्रियांच्या आजारांबद्दल माहिती दिली जात नाही. मात्र

गावपातळीवर त्यांना प्रामुख्याने स्त्रियांबरो बरच काम करावे लागते. 'दिशा' मध्ये स्त्रियांच्या प्रजनन - आरोग्यविषयी माहिती दिली असली, तरी 'पुस्तकाची सुरुवातीची पाने चाळताना लक्षात येते की पुस्तकाची रचना थोडी वेगळी आहे. पुस्तकाच्या सुरुवातीला अनुक्रमणिका नसून 'विषय-सूची आहे. 'या सूचीवरून असे दिसते की स्त्रियांच्या जननेंद्रियांची माहिती, जननेंद्रियांचे आजार, गर्भधारणा', बाळंतपण, गर्भनिरोधके आणि शस्त्रक्रिया असा माहितीचा सर्वसाधारण अनुक्रम आहे. मात्र पुस्तकाची काही पाने वाचताच अनुक्रमणिकेऐवजी विषय-सूची देण्याचे कारण स्पष्ट होते. ते म्हणजे 'केवळ तांत्रिक माहिती देणारे पुस्तक' असे या पुस्तकाचे स्वरूप नाही. या पुस्तकात 'आयुषी' या (काल्पनिक) ए.एन.एमचा जीवनक्रम रेखाटलेला आहे, आणि तो रेखाटत असताना तांत्रिक माहिती दिलेली आहे. पण जर एखाद्या विशिष्ट विषयाची माहिती वाचकाला हवी असेल, तर ती सूचीमुळे चटकन सापडू शकेल.

पुस्तकामध्ये आयुषीबरोबरच तिच्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील सिस्टर जगताप, डॉ.निर्मला इ. पात्रे आपल्याला भेटत राहतात आणि प्राथमिक आरोग्य केंद्र आणि समाज यांच्यातील आंतरक्रियांचा पटच आपल्यापुढे उलगडत जातो. अर्थात ए.एन.एम. त्यात केंद्रस्थानी आहे. आयुषीच्या जीवनात घडणाऱ्या घटना संभाषण, चर्चा, तिच्या मनात येणारे विचार या माध्यमांमधून मांडल्या आहेत. त्यामुळे विषय कंटाळवाणा न होता रंजक होतो. पुस्तकाला सुरूवात होते ती आयुषीला सरकारी नोकरीचा कॉल येतो तेथे. तेथेच ए.एन.एम्सना मिळणाऱ्या सरकारी व खाजगी नोकऱ्यांमधला फरक, खाजगी नोकऱ्यांमध्ये येणारे अनुभव, राखीव जागांचे धोरण या प्रश्नांची चर्चा केलेली आहे. यानंतर आयुषी ग्रामीण भागातील नोकरीच्या ठिकाणी राहायला जाते. सर्वसाधारणपणे अपरिपक्व वयात ग्रामीण भागात जाऊन एकट्या राहणाऱ्या अविवाहित ए.एन.एम.ला काय अडचणी येतात, ती कशी असुरक्षित असते, या बाबींची चर्चा या टप्प्यांवर केली आहे. पण येथे फक्त अडचणींचे वर्णन नाही, तर त्याही परिस्थितीत ए.एन.एम्स एकमेकींना मदत कशी करू शकतील हे त्यांच्या संभाषणातून समजते. याच्याही पुढे जाऊन ए.एन.एम.ने कोणती काळजी घ्यावी याविषयी स्पष्ट सूचना (पान १०) केलेल्या आहेत. यानंतर आयुषीला प्रत्यक्ष काम सुरू केल्यावर गावकऱ्यांशी संवाद साधताना येणाऱ्या अडचणी व त्यावर तिने शोधलेले उपाय, गावातील स्त्रियांच्या मिटींगमध्ये मासिक पाळीबद्दल माहिती देण्याचा तिचा प्रयत्न आणि त्यावरील स्त्रियांच्या प्रतिक्रिया, या अनुषंगाने येणारी मासिकपाळी व संबंधित आजारांची तांत्रिक माहिती या क्रमाने विषय मांडला आहे.

पुढे आयुषीचे लग्न आणि तिच्या बहिणीचा सासरी छळ होऊन जळून मृत्यू होणे या प्रसंगाच्या निमित्ताने कुटुंबातील संबंधांचे राजकारण, स्त्रियांवर होणारे अत्याचार व पोलिस-तपासाची प्रक्रिया यांची माहिती दिली आहे. आयुषीच्या गरोदरपणाच्या निमित्ताने गरोदरपणात शरीरात होणारे बदल; तपासण्या, गरोदरपणातील समस्या, आहार, व्यायाम आणि धोक्याची गर्भधारणा इ. माहिती सविस्तर दिली आहे. गर्भाच्या वाढीच्या विविध टप्प्यांची

माहिती सुस्पष्ट आकृत्यांसह दिली आहे. एखादी स्त्री गरोदर असताना नोकरी करत असेल, तर तिचे सहकारी तिची कशी काळजी घेऊ शकतील याबाबतच्या सूचनाही आयुषीच्या निमित्ताने येतात. पुढे आयुषीच्या बाळंतपणाच्या निमित्ताने प्रसूतीचे टप्पे आणि बाळाच्या जन्माच्या वेळचा प्रवास यांची आकृतीच्या सहाय्याने माहिती दिली आहे. वय, कामाचे स्वरूप, आर्थिक परिस्थिती या सर्वांचा गरोदरपण व बाळंतपण या बाबींवर कसा परिणाम होतो हे आयुषीला गावात आलेल्या अनुभवांच्या आधारे उदाहरणे देऊन वर्णन केले आहे. कुटुंबनियोजन आणि लोकसंख्यावाढीच्या प्रश्नांची माहिती प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांमध्ये झालेल्या चर्चेच्या स्वरूपात दिल्यामुळे कंटाळवाणी होत नाही, आणि त्यातून भिन्नभिन्न मते पुढे येतात. यानंतर आयुषी कुटुंबनियोजनासंबंधीच्या एका कार्यशाळेला जाते आणि त्यानिमित्ताने १९९४ मधील कैरोच्या लोकसंख्याविषयक आंतरराष्ट्रीय परिषदेची माहिती, तसेच कुटुंबनियोजनाच्या पध्दतींची माहिती आकृत्यांसह मिळते.

एका आरोग्यरक्षिकेच्या अविवाहित मुलीला दिवस जाण्याच्या घटनेच्या संदर्भात असुरक्षित गर्भपात, त्याची सामाजिक कारणे आणि डॉक्टरांनी अशा घटनांचा पैसा मिळवण्याची संधी म्हणून उपयोग करून घेणे या बाबींची चर्चा केली आहे. गर्भपाताचे प्रकार आणि कोणत्या परिस्थितीत स्त्रीला रूग्णालयात पाठवावे याबाबत सूचना केल्या आहेत.

पुढे आयुषी महाराष्ट्रातील आदिवासी भागात कार्यशाळेसाठी गे ल्यावर आदिवासींचे जीवन पाहते, त्याबाबत तिथे आ णि परतल्यावर चर्चा करते, आणि अशा तऱ्हेने लैंगिक ता आणि लैंगिकतेकडे पाहण्याचे वेगवेगळे दृष्टिकोन य ांची चर्चा होते. प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यां री डी.एच.ओं. च्या उपस्थितीत जी मिटींग होते, त यानिमित्ताने कर्मचाऱ्यांमधील परस्पर संबंधाचे रा जकारण आणि पुरूषप्रधान समाजाचे राजकार ण यांची चर्चा होते, मेडिकल ऑफिसरचे सहकार्य अस ेल तर ए.एन.एम्सना नवनवे शिक्षण घेत राहण्याची संधी उपलब्ध होऊ शकेल आणि ग्रामीण पा तळी वर त्या त्या ठिकाणी आढळणाऱ्या विशिष्ट सम स्यांवर (उदा. विशिष्ट पिकांच्या लावणी / खुरपणी च्या पध्दतीमुळे होणारे त्रास) ए.एन.एम्स उपचार कर ू शकतील ही शक्यता उदाहरण देऊन व्यक्त करण्यात आली आहे.

याव्यतिरिक्त स्त्रियांमध्ये मोठ्या प्रमाणावर आढळणारी पाठदुखी /कंबरदुखी आ णि त्यावर उपयुक्त आसने, तसेच कुपोषण आणि रक्त क्षय व त्यांच्या सामाजिक कारणांची चर्चा पुढे येते. पाळी बंद होणे, प्रोलॅप्स, वृध्द स्त्रियांचे आजार, स्तन ांमधील गाठी याबाबत माहिती दिल्यावर सर्वसामान्य ए.एन.एमला घरात व नोकरीच्या ठिकाणी रोज कराव्य ा लागणाऱ्या एकूण कामांचा आढावा घेतला आहे.

ए.एन.एमला कामाच्या स्वरूपामुळे होणारे आरोग्यविषयक त्रास व अन्य अडच णी यांच ी शेवटी चर्चा केली आहे. यामध्ये लैंगिक छळ ; आणि त याबाबत स्त्रियांच्या संघटना काय करू श कतील या विषयी विचार मांडले आहेत.

पुस्तकाची भाषा सोपी आणि ओघवती आहे. संपूर्ण पुस्तकात आयुषीच्या वैयक्तिक व व्यावसायिक जीवनातील प्रसंग दाखवणारी सुबक व सुटसुटीत रेखाचित्रे अधूनमधून दिसतात. आवश्यक तेथे शरीरातील अवयव, शरीरप्रक्रिया आणि उपचारांसाठी वापरलेल्या साधनांच्या सुस्पष्ट आकृत्या आहेत.

आयुषीच्या जीवनक्रमाच्या अनुषंगाने आरोग्यविषयक माहिती दिलेली असली, तरी कृत्रिम सांधेजोड केल्यासारखे स्वरूप पुस्तकाला येत नाही. याचे कारण म्हणजे पुस्तकाचे लेखन करणाऱ्यांना विषयाची सखोल माहिती आहे. त्यामुळे गावपातळीवर असणारे राजकारण, सरकारी आरोग्यसेवेची संरचना व त्यातून निर्माण होणारे राजकारण, आणि या सर्वांमुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीत काम करणाऱ्या ए.एन.एमला येणाऱ्या असंख्य अडचणी यांची सविस्तर माहिती देणे शक्य झाले आहे, उदा. बदल्या, कौटुंबिक अडचणी, असुरक्षितता यातून ए.एन.एम कशाकशा मार्ग काढतात याची उदाहरणे (पान १०-१२) पाहावीत. अंधश्रध्दा, राखीव जागांचे धोरण, ॲलोपथीचा स्त्रियांच्या आरोग्याकडे बघण्याचा दृष्टिकोन, गर्भनिरोधकांना ग्रामीण जनतेचा विरोध, हिंसा, स्त्रियांवर होणारे अत्याचार, सासरी छळ होणाऱ्या महिलेबद्दल माहेरच्या माणसांचा दृष्टिकोन इ. अनेक गोष्टींच्या मुळाशी जाऊन त्यांची सामाजिक-आर्थिक कारणे शोधण्याचा प्रयत्न येथे दिसतो. तसेच अतिशय धीटपणे आणि स्पष्ट शब्दात केलेल्या सूचना आणि मतेही आढळतात. उदा. पान १० वर दिलेली चौकट: 'ए.एन.एमने गावात गेल्यावर घर शोधताना खालील गोष्टी ध्यानात ठेवाव्यात', किंवा पान २२४-२२५ वर आदिवासी समाज व अन्य समाज यांच्या लैंगिकतेविषयीच्या मूल्यांवर व्यक्त केलेली मते.

पुस्तकाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे ॲलोपथीबरोबरच अन्य उपचारपध्दतींबाबत आणि स्थानिक पारंपरिक उपचार पध्दतींबाबत असलेली सकारात्मक भूमिका. काही वेळा गावातील लोकांना परंपरेतून आलेल्या ज्ञानावरच अवलंबून राहणे भाग असते, याची जाणीव लेखकांना आहे. पुस्तकातील सर्व चर्चांमध्ये सर्वसामान्य माणसाच्या श्रध्दा, समजुती, मते यांना स्थान असल्यामुळे प्रचारकी साहित्यांचे स्वरूप येण्याचा धोका टळून मजकूर रोचक बनला आहे

पुस्तकाचा हेतू केवळ अडचणी मांडण्याचा किंवा समाजातील अपप्रवृत्तींवर टीका करण्याचा नाही. भारतासारख्या गरीब देशात, ग्रामीण भागात अतिशय मर्यादित प्रमाणात उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीमधूनही अडचणी सोडवण्यासाठी कसा मार्ग काढता येईल यासंबंधी व्यवहार्य सूचना ठिकठिकाणी केलेल्या आहेत.

हे पुस्तक ए.एन.एम्सना डोळ्यासमोर ठेवून लिहिलेले आहे. त्यांना ते फार उपयुक्त वाटेल यात शंकाच नाही. पण स्त्रियांच्या आरोग्याविषयी माहिती करून घेण्याची इच्छा असलेल्या कोणालाही ते उपयुक्त वाटेल आणि स्त्री-आरोग्याकडे बघण्याची एक दृष्टी त्यातून मिळेल. आकृत्या व सुरुवातीला दिलेली

सूची यामुळे स्त्रियांच्या प्रजनन आरोग्याशी संबंधित काम करणाऱ्यांना त्याचा उपयोग एखाद्या संदर्भ ग्रंथाप्रमाणे करता येईल. ए.एन.एम्सना प्रजनन-आरोग्याची सर्वांगीण माहिती मराठीतून देणारे पुस्तक प्रसिध्द केल्याबद्दल सामाजिक आरोग्य संशोधन संस्थेला धन्यवाद दिले पाहिजेत.

OO

'दिशा'
सीमा देवधर,
सामाजिक आरोग्य संशोधन संस्था, ८५ आनंद पार्क, औंध, पुणे-७, देणगी मूल्य रू. २००/-

*'एका शापाची ....**(पृष्ठ ६ वरुन पुढे)*

साधनांची अनुपलब्धी, सॅनिटरी नॅपकीन्सची अपुरी व्यवस्था यांसारख्या व्यावहारिक समस्यांचे यथायोग्य चित्रण लेखिकेने केले आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनातून दिलेली माहिती हे परिशिष्ट उद्‌बोधक आहे, ते प्रत्येक स्त्रीने वाचले पाहिजे. पुस्तकाचे मुखपृष्ठ स्त्रीजीवनाची नाळ ज्या आदिम संस्कृतीशी जोडली आहे तिचे प्रतीक आहे. हे चित्र पुस्तकातील विचारांचे प्रातिनिधिक रूप आहे. पुस्तकाचे वाङमयीन मूल्य याने निश्चितच उंचावले आहे. एका दुर्लक्षित विषयावर उत्कृष्ट पुस्तक लिहून स्त्री-अभ्यासात भर घालणाऱ्या लेखिकेने आणखी पुस्तके लिहावीत ही सदिच्छा.

OO

'एका शापाची जन्मकथा'
लेखिका - अरूणा देशपांडे, प्रथमावृत्ती - ऑक्टोबर १९९४
प्रकाशक - लोकवाङ्मयगृह, मुंबई - २५
पृष्ठे - १६३, मूल्य - ८० रूपये

कानोसा ... *(पृष्ठ ४ वरुन पुढे)*

प्रचलित समजुतींची माहिती दिली आहे. त्यांत घरगुती व वनस्पती औषधींचीही माहिती आहे.

'कानोसा' या पुस्तकात जीवन-प्रजनन विषयक व स्त्री-पुरूष संबंधाविषयी संवेदनक्षम, नाजूक बाबींचा शास्त्रीय संशोधनाच्या माध्यमातून यथार्थ ऊहापोह आहे. या पुस्तकात दिलेले प्रश्न महाराष्ट्राच्या व भारताच्या इतर भागात विचारल्यास त्या उत्तरातून महाराष्ट्र व भारतीय समाजाचे चित्र स्पष्ट होईल.

सर्व ग्रामीण भागातील समाज कार्यकर्त्यांनी या पुस्तकाचा अभ्यास करावा. तसेच ग्रामपातळीवर काम करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांनी या उत्तरांची गंभीरपणे दखल घ्यावी. या उत्तरांचे आयुर्वेदिक संदर्भ तपासून पाहावेत म्हणजे ते भारतीय पारंपरिक शास्त्राप्रमाणे योग्य आहेत किंवा-कसे ते कळेल. या सर्व बाबी विचारात घेतल्या तर लोकांसाठी आरोग्य शिक्षण व उपचारपध्दती लोकाभिमुख करता येतील. त्यामुळे आरोग्यप्रकल्पात लोकांचा सहभाग वाढेल. लोक म्हणतात तो मूर्खपणा, व आधुनिक शास्त्रज्ञ म्हणतात ते सत्य या विचारसरणीतून विकास साधत नाही, हा धडा सर्व विकास कार्यकर्त्यांना व कर्मचाऱ्यांना उमजावयास हवा, हा संदेश 'कानोसा' या पुस्तकातून मिळतो. डॉक्टर राणी बंग यांचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार.

OO

(कानोसा, डॉ. राणी बंग. ग्रंथाली प्रकाशन, जानेवारी १९९९.)

पुस्तक परिचय

‘पण लक्षात कोण घेतो ?’

विधवांच्या समस्येचं दर्शन घडविणारी सामाजिक कादंबरी

आरती कौलगेकर

कै. हरिभाऊ आपटे यांच्या ‘पण लक्षात कोण घेतो ?’ या कादंबरीने एकेकाळी महाराष्ट्रातील स्त्री-पुरूष वाचकांमध्ये खळबळ उडवली होती. याचे कारण म्हणजे या कादंबरीने लोकस्थितीतील वैग्गुण्ये लोकांच्या पुढे मांडून लोकांना समाजस्थितीचा विचार करण्यास भाग पाडले होते.

कादंबरीचे कथानक तसे 'यमुना' ह्या पुरोगामी, ब्राम्हण कुटुंबात जन्मलेल्या 'स्त्री' भोवती आहे, पण समाजातील स्त्रियांचे स्थान, त्यांना मिळणारी वागणूक, पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या रूढींमुळे स्त्रियांच्या मनावर, मानावर होणारा परिणाम वेगवेगळ्या व्यक्तिरेखांमधून समोर येतो. 'दुर्गी' यमूची जिवाभावाची मैत्रिण. अजाणत्या वयात लग्न झालेले.

आनंदात आणि सुखात वाढलेली दुर्गी जेव्हा लहरी नवरा आणि सासरच्या छळाला कंटाळून जीव देण्याची भाषा बोलते तेव्हा यमुनाच तिला धीर देते. समाजाला 'वाळवी' सारख्या पोखरणाऱ्या रीतीरिवाजांना झुगारून 'स्त्री' नावाचे चैतन्य तिच्यात भरते. याचबरोबर गणपतराव म्हणजेच यमूचा दादा, रघुनाथराव यमूचे पती या आणि आणखी काही व्यक्तीरेखा या रूढींविरूध्द आपापल्या परीने लढण्याचा प्रयत्न करतात. 'सुधारक' म्हणून हिणवणाऱ्या समाजाचा तिरस्कृत दृष्टिकोन पचवून समविचारी मंडळींना एकत्र करून अन्यायाला वाचा फोडण्याचे काम जिद्दीने सुरू ठेवतात आणि म्हणूनच सर्व व्यक्तीरेखा आपापला एक ठसा उमटवून जातात.

यमुना लहानपणापासूनच समाजातील चालीरीतींना पुरेपूर जाणून होती, कारण लहानपणाच्या बाहुलीच्या लग्नात सुध्दा हुंडा, मानपान, देणे-घेणे विषयांवरून होणारे वाद याची साक्ष देत होते. बाहुलीची आई म्हणजे शेजारची ठकी. या ठकीला अगदी ठिकठिकाणी वाकवीन, टाकून-खोचून बोलेन, निदान हिऱ्याची अंगठी किंवा तीन तोळ्याचे वळे घेतल्यावाचून सोडणार नाही या आणि अशा अनेक वाक्यांनी बाहुलीच्या लग्नाचा सोहळा वाजत गाजत पार पडायचा. त्याच वयात यमूच्या मैत्रिणींची लग्नं हळूहळू एक एक करत जमून गेली आणि वाजत गाजत पार पडली.

त्या ७-८ वर्षांच्या लग्न झालेल्या मुली माहेरहून सासरी आणि सासरहून माहेरी येताना पाहिल्या व त्यांच्या अंगावरील दागदागिने पाहिले की आपले लग्न केव्हा होईल आणि आपणही असंच दागदागिने अंगावर चढवून नगगोंड्यांनी भूषविलेला वेणीचा शेपटा पाठीवर लडबड करीत, बिंदी कपाळावर चढवून, पुतळ्यांची हरपररेवड्यांची वगैरे माळा गळ्यात घालून, त्यातले कारले पोटावर लडबडवीत, वाळ्यातोरड्यांच्या नादावर ठुमकत मुरडत चालत इकडे तिकडे केव्हा हिंडू असे यमूला सुध्दा झाले होते.

त्या काळात म्हणजेच १८९० - १९०० च्या सुरूवातीच्या सुमारास मुलीचे लग्न ७-८ व्या वर्षी झाले म्हणजेच वेळेत झाले असे समजले जायचे. १०-११ व्या वर्षीच्या मुली घोडनवऱ्या म्हणून हिणवल्या जायच्या. स्त्रियांच्या मनाची अशी पक्की खात्री होती की लग्ने, मुलेबाळे आणि चूल याखेरीज बायकांना काही देखील काम नाही. अर्थात असा समज होण्यासाठी मुलींच्या सामाजीकरणाचा मोठा सहभाग आहे. अगदी लहानपणापासून लोकं बोललेली समजू लागल्यापासून म्हणजे ३-४ वर्षांपासून त्यांच्या कानी-कपाळी सारखे हे शब्द पडत असत, 'पोरीला कशाला एवढे ढंग पाहिजेत? उद्या सासरी जायचं आहे.' 'हं अशी पालथी मांडी घालू नकोस'. 'पोरीच्या जातीला असे लाड नाही हो कामाचे.' 'कारट्या येतात कशाला जन्माला कुणाला ठाऊक.'

या असल्या प्रकारच्या बोलण्यांचा परिणाम मुखतः व्हायचा तो होतोच; आपला बायकांचा जन्म म्हणजे अतिशय वाईट. लहानपणी बापाच्या, तरूणपणी नवऱ्याच्या व वृध्दपणी मुलांच्या सुखाकरिता आपला जन्म आहे. बायका आणि सुख यांची भेट कधीही होणार नाही, मात्र कष्ट आणि आपण यांची गट्टी अतिशय जबरदस्त, बायकांना स्वतंत्रता मुळीच नाही. या आणि अशा अनेक गोष्टी लहानपणापासूनच मुलींच्या मनावर चोखपणे ठसतात आणि याला यमुना, दुर्गा, ठकी कोणाचाही अपवाद नाही.

आता यमुनाचे वय १०-११ वर्षांचे होते. पहिल्या-वहिल्याने जे 'पाहण्याला' येणाऱ्या मंडळींचे कौतुक वाटत असे, ते आता तितके वाटेनासे झाले. मुलगी लग्नाचे वय ओलांडून पुढे गेली असे सगळे म्हणायला लागले. आता बघायला येणाऱ्या गृहस्थांची वये १२-१५ नसून ५०-६० वर्षांची होती. 'आता बिजवर बघा, आणि मुलीचे उरकून टाका' असे म्हणणाऱ्या मंडळींची संख्या वाढायला लागली होती. स्वतः बिजवर, तिजवर असूनदेखील यमूची मात्र कसून चौकशी केली जायची. एकदा साठीच्या जवळ वय असलेल्या गृहस्थाने पाहायला आल्यावर चालून दाखवायला सांगितले. पाच सहा वेळा र, ड ह्या अक्षरांचे उच्चार करायला लावले. मुद्दाम काही कठीण शब्द निवडून अमूक म्हण, तमूक म्हण असे सांगितले.

अशा रीतीने होणारी वधू परीक्षा यमूला फार विचित्र वाटायची. त्या काळच्या रीतीनुसारच सगळे होत असे; परंतु मुहुर्ताचे दिवस संपले असल्यामुळे त्यावर्षी यमूचे लग्न लांबणीवर पडले. त्याला दुसरे कारण पण तसेच घडले, यमूची आई गर्भधारणेमुळे खूप थकली होती आणि बाळंतपणानंतर तिला क्षयरोग तर होणार नाही ना? म्हणून सगळे काळजीत होते. थोड्याच दिवसात यमूला भाऊ झाला. बाळंतपण घरीच झाले. तरी पण आईचा ताप काही कमी होत नव्हता. यमूला घराबाहेर दुर्गीकडे खेळायला जायला सवड मिळेनाशी झाली. छोट्या बग्याला घेऊन बसावला लागायचे. दुपारी आईला भक्ति-विजय वाचून दाखवायला लागायचा. संध्याकाळी स्वयंपाकात आजीला मदत करायला लागायची. कधी कधी तर बग्याला न्हायला घालायला लागायचे. आई आणि आजीच्या मते 'पोर इतकी शहाणी निघेल असं वाटत नव्हतं'. आता आईला, स्वतःच्या प्रकृतीची खात्री नसल्यामुळे यमीच्या लग्नाची घाई झाली होती. म्हणून सतत

दुःखी असायची; त्यातच भर म्हणून एक दिवस लहानगा बग्या अचानक श्वास लागून गेला. हळू हळू दुःख कमी झाले. त्यातच पुण्याच्या एका स्थळाची यमूला पसंती आली. मुलगा शिकत होता, १६ वर्षांचा. यमुच्या आईला बापाविना पोराला आपली यमू द्यावी वाटत नव्हते, पण वय सरत चालले. हुंडा मान आवाक्यातला, टिपणे जुळली होती. एक दिवस चांगला मुहूर्त बघून यमूचे लग्न लागले. धाकटा दीर, धोंडू भावजी आणि बनू वन्संनी मांडवातच नव्या नवरीला टोचून बोलून अगदी हैराण केले होते.

पण आईची शिकवण होती, 'कितीही झाले तरी उलटून बोलायचे नाही. तक्रार करायची नाही.' यमूच्या सासरी जाण्यामुळे सगळ्यांना वाईट वाटले असले तरी एकदाचे ओझे उतरल्याचा आनंद जास्त झाला होता. पण हा आनंद फार काळ टिकला नाही. १०-१५ दिवसांनी आईची प्रकृती खंगत जाऊन एक दिवस क्षयाने ती दगावली. यमूचा खरा आधार फक्त दादा (गणू) राहिला. आजी आता थकली होती. आई जिवंत असताना घरी जो आनंद होत असे तो आता माहेरी आल्यावर होत नसे. दरम्यानच्या काळात वडिलांनी दुसरा विवाह केला होता. नवी सावत्र आई तशी यमूहून थोडीच मोठी होती, पण स्वभावाने हेकेखोर, विलक्षण तऱ्हेने वागायची. गणूदादा आणि धाकटी बहीण सुंदरीची जेवायला सुध्दा मारामार पडू लागली. पण यमूला हे सगळे ६-६ महिन्यांनी एकदा जेव्हा माहेरपणाला जायची तेव्हा कळायचे.

यमूचे लग्न होऊन दोन वर्षे झाली, पण परिस्थितीत काही फरक पडला नाही. सासरी खूप आजे, मामे सासवा होत्या. फक्त सख्खी सासूच स्वभावाने प्रेमळ होती, पती पण प्रेमळ होते पण त्या-काळच्या रिवाजानुसार पतीशी आठवडाभर, महिनाभर सुध्दा भेटायला किंवा बोलायला मिळायचे नाही. एकदा कधीतरी दोन शब्द बोलताना बनू वन्संनी पाहिले आणि सगळे घर डोक्यावर घेतले. 'घरातले सगळे ताळतंत्र सोडले पोरीने. घराण्याची अब्रू जाईल अशाने' ह्या सारखी पन्नास वाक्ये ऐकायला लागली.' पण त्यावेळी बोललेल्या ४-२ शब्दांनी तिच्या मनातले 'नवरा' या विषयीचे गैरसमज दूर होण्यास मदत झाली. 'नवरा' हा शब्द उच्चारण्याबरोबर लहानपणी तरी निदान भीतीखेरीज दुसरे काही वाटत नसे. मारणे, रागावणे या दोन्ही गोष्टी त्या एका शब्दात भरलेल्या असायच्या. पूर्वीची एक म्हण सगळ्या बायका आवर्जून म्हणायच्या, 'साप म्हणू नये बापडा, नवरा म्हणू नये आपला !'

दरम्यानच्या काळात दुर्गीची खूप दिवसांनी गाठ पडली, तेव्हा कळले की तिला तिचा नवरा खूप मारतो, जाच करतो. सासू सासरे सारखे टोचून बोलतात आणि माहेरहून पैसे आणण्यासाठी हट्ट करतात. पण हा सगळा छळ दुर्गी एकही शब्द न बोलता सहन करीत असे. त्यातच ती गर्भारशी होती. बोलताना सुध्दा दम लागायचा, निस्तेज झाली होती. कित्येक वैद्य आणि डॉक्टर झाले पण उपाय होत नव्हता. फक्त दुर्गीची बाळाची हौस दांडगी होती म्हणून ती त्याही अवस्थेतून वाचली. नव्या बाळाने थोडा विरंगुळा मिळाला, पण तरी सुध्दा दुर्गीचे जिव्हाळ्याचे असे कोणी नव्हते. दादाच्या

लग्नाच्या निमित्ताने जेव्हा यमू माहेरी गेली, तेव्हा दुर्गीच्या आणि तिच्या भेटी होत होत्या. यमूला दादाचा फार मोठा आधार होता आणि आई गेल्यापासून तर त्यांच्या काळजीने तिला रात्र रात्र झोप येत नसे. आता दादाचे लग्न झाल्यावर तिला बरे वाटत होते, पण थोड्याच दिवसात दादाचे आणि वहिनीचे पटत नाही हे तिला कळून चुकले. आणि खरं कारण एक दिवस दादाकडूनच कळले. दादावर अभ्यासाचे ओझे होते. रात्र रात्र जागून परीक्षेचा अभ्यास करायला लागायचा.

अशावेळी दादाने नव्या नवरीला थोडी वाचन आणि लिखाणाची गोडी लागावी म्हणून पुस्तकं विकत आणली आणि रोज थोडा वेळ तरी अभ्यास कर म्हणून सांगितले. पण यमूच्या वहिनीला अभ्यासात मुळीच रस नव्हता. त्यावरून दोघांच्यात वाद झाला आणि तो इतका विकोपाला गेला की ते दोघे एकमेकांशी बोलत नसत. दादाने एके दिवशी रात्री यमूला वरील सर्व हकीगत सांगितली आणि म्हणाला, 'यमे, तिच्या माहेरी इंग्रजीचा की कसला गंध देखील नाही. बायकांनी शिकणं म्हटलं की कपाळाला पित्त चढायचं? असली खोडं खुडकं घरात, तिला इच्छा कशी व्हावी? आणखी इकडच्या घरांत कितीसा उल्हास आहे तो दिसलाच आज आपल्याला. आता तुला बारीक कोणचीही अडचण नाही; तर असं काहीतरी करशील की लोकांनी तोंडात बोटच घालावं'

दादाचे हे बोलणे ऐकून यमेला कळेना आता काय करणार आपण, पण तिला ठाऊक होते की तिकडच्या स्वारीत पण यमूनी शिकावं, वाचावं, लिखाण करावं असं सतत वाटायचं; परंतु घरात इतक्या सासवा, सासरे आणि त्यांनी जर यमूला पुस्तकाला हात लावताना जरी बघितलं असतं तरी मोठं आक्रीत घडलं असतं. आणि म्हणूनच यमूला तिच्या 'तिकडच्या स्वारी' च्या परीक्षेच्या निकालाची खूप उत्सुकता आणि काळजी होती. जर उत्तम रीतीने मार्क पडले तर स्वारी यमूला घेऊन मुंबईला कॉलेजात शिकण्याच्या निमित्ताने बिऱ्हाड करणार होती. नवीन बिऱ्हाडात गेल्यावर आपली शिकण्याची इच्छा आणि तिकडची हौस भागवायची असं ठरलं होतं.

अपेक्षेप्रमाणे उत्तम गुण मिळवून रघुनाथराव मुंबईला रवाना झाले. यमूला एकटे राहणे जिवावर आले होते, पण थोड्याच दिवसात मुंबईला राहण्याची तजविज झाली म्हणून यमूला तिकडं घेऊन जायचं नक्की झालं. पण एकत्र कुटुंब सोडून मुलगा फक्त पत्नी बरोबर एकटाच वेगळा राहणार म्हणून मामे सासऱ्यांनी शंकर मामंजींनी आणि आजे सासूने एकच गोंधळ केला. परंतु तिकडे जेवणाचे हाल होतील, दुखलं खुपलं तर मदतीला कोण? या आणि इतर अनेक सबबींवर सगळे कबूल झाले.

अनेक वर्षे पुण्यात आणि फार फार तर आजीच्या गावी जाण्याचा प्रसंग आलेली यमू मुंबई बघून दडपून गेली. त्या गाड्या, ट्रॅमवे, गर्दी, उंच इमारती सगळं पाहून गोंधळून गेली. परंतु गिरगावातल्या घरी गेल्यावर सगळं विसरून गेली. तिचे आणि तिच्या सासूबाईंचे स्वागत करायला रघुनाथरावांचे दोन स्नेही सपत्नीक तिथे आले होते. यमूचे लग्नातले नाव सीता होते. रघुनाथराव-सीताबाई आणि तिच्या सासूबाई यांना आग्रहाने

जेवणाची आमंत्रणे मिळाली. थोड्याच दिवसात लक्ष्मीबाई, यशोदाबाई आणि यमू यांची घट्ट मैत्री झाली. या दोघी नवऱ्याच्या आग्रहामुळे चुकतमाकत का होईना पण इंग्रजी वाचायच्या. ही मैत्री होण्यामागे महत्त्वाचे कारण म्हणजे तिघींच्या पतींचे विचार तंतोतंत जुळत असत. बायकांना शिकविण्यासंबंधाने, लहानपणी लग्न करण्यासंबंधाने, विभक्त राहण्यासंबधाने ह्या गोष्टी जुळत असे. अशा शेजाऱ्यांच्या सहवासात यमूचे वाचन, लिखाण आणि अभ्यास जोमाने सुरू होता.

जेव्हा केव्हा भेटी होत तेव्हा निरनिराळ्या विषयांवरून चर्चा होत असे, जसे बायकांच्या शिक्षणावर, मुलींची शाळेची हकीकत वाचून आणि या सगळ्या विषयात यमूने रस घेऊन आपले विचार मांडावेत असे रघुनाथरावांना वाटे. त्याची तयारी म्हणून रोज रात्री एक तास ती त्यांना वाचन करून दाखवायची. वाचताना चुकलं तर यमूला वाटायचं, 'आपण ह्यांच्या योग्यतेचे नाही' पण तिच्या पतींनी तिला खूप प्रोत्साहन दिलं. त्यांच बरोबरीने सख्ख्या शेजारणी पण खूप मदत करायच्या. विणकाम, शिवणकाम ह्यांच्या बरोबरीने वाचणं लिहिणं आणि सभाधीटपणा शिकवला. कालांतराने रोज रात्री ही ३ कुटुंबे एकत्र येऊन वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करू लागली. मनाला न पटणाऱ्या अनेक चालीरीतींविरूध्द आपली मते मांडायची. नवीन काही वाचलं असेल तर ते एकमेकांना सांगायचे.

अशा प्रकारच्या भेटी वारंवार होत असत. आणि सगळ्यांचा कळस म्हणजे एके दिवशी सगळ्यांनी सभेला जायचे ठरले. पुरूषांनी ठीक पण बायकांनी घराबाहेर पडून सभेला जायचे विचार यमूला पटत नव्हते. त्यातच सासूबाईंच्या देखत जोडीने बाहेर जायचे या कल्पनेने ती शरमिंदी झाली होती. आणि हे सगळं पुण्याला कळलं तर काय गजब होईल ह्या कल्पनेनेच तिच्या अंगावर काटा आला. तिने खूप आढेवेढे घेतले पण शेवटी सासूबाईंची परवानगी मिळाल्यावर यमूला जाणं भाग पडलं.

यामुळे यमूच्या आचारात, विचारात, फरक पडला होता. सगळ्या गोष्टींचा ऊहापोह करून चांगले-वाईट काय हे समजून घेण्याइतपत प्रगती झाली होती. तिकडून उत्तेजन सतत मिळत असायचं. बायकांना चूल-मूल ह्याखेरीज अनेक गोष्टीत रस असू शकतो, त्याही विचार करू शकतात हे माहीत नसलेल्या यमूला सौ. सीताबाई झाल्यावर अनेक गोष्टींत ती तरबेज झाली होती. सख्ख्या मैत्रिणीची, दुर्गीची अशी अवस्था का झाली, याची मूळ कारणं शोधून त्याविषयी चर्चा करण्याइतपत धाडस आले होते.

पण हे सगळे फार दिवस शंकर मामांजींपासून लपून राहिले नाही. रघुनाथरावांबरोबर त्यांच्या कॉलेजच्या बक्षिस समारंभाला उपस्थित राहिल्याचे निमित्त झाले आणि शंकरमामांजींचे पुण्याहून भले मोठे पत्र आले. 'अलिकडल्या मुलांना इंग्रजी शिकवले म्हणजे त्यांना ताळतंत्र काहीच राहात नाही. जी गोष्ट आमच्या कुळाच्या स्वप्नी देखील कधी पाहिली नाही, ती आपण करून आमच्या घराचे फार चांगले नाव केले ! आता आम्हाला येथे बाहेर तोंड काढण्यास जागा राहिली नाही. परवा दुकानात गेलो तर, 'आपले भाचे बडे सुधारक झाले ! परवा कुठे सभेत

बायकोला घेऊन गेला म्हणे ! तुमची सून मोठी विद्वान झाली !' असे ऐकायला लागते,... पण आपल्याला याची थोडीच चाड आहे. आता सांगणे एवढेच की पुन्हा आमच्या इथे येण्याच्या भानगडीत आपण पडू नये......

दुसऱ्यांच्या कार्टर्यांचे वर्तन पाहून जे आम्ही हसत होतो, त्या आम्हालाच आज मान खाली घालण्याचा प्रसंग आला. असो..आता आणखी काही लिहून, आपला सितारामाचा जोडा कुठे सभेला जायचा असेल तेव्हा व्यर्थ वेळ घेत नाही.....' हे पत्र वाचून रघुनाथरावांचा संताप अनावर झाला, तर यमू इतकी रडली, अन्न गेले नाही. शंकरमामांजी एवढेच बोलून थांबले नाहीत तर तिकडे पुण्यात यमूच्या दादाला नाही नाही त्या प्रसंगाचा मसाला करून हकीगती सांगितल्या. गावभर निंदा करत सुटले होते. हे सर्व दादाच्या एक पत्रावरून समजले. इतके सगळे होऊन सुध्दा रघुनाथराव थंड होते. सगळ्याचं सार एकाच वाक्यात सांगितले. 'ज्याला पहायचं नाही; त्याच्यासारखा आंधळा, आणखी ऐकायचंच नाही; त्याच्यासारखा बहिरा कोणी नाही. शंकरमामांसारख्यांचा जन्म जुन्या रीतीला सोडून चांगली गोष्ट करायला गेले की त्यांची टर उडवण्यासाठी, छळ करण्यासाठी झाला आहे. तेव्हा ह्या शिव्या शापांकडे दुर्लक्ष करणे.'

कॉलेजच्या सुट्टीत तिघेजण सासूबाईंच्या मर्जीनुसार पुण्याला गेले. कोणीही स्वागत करायला आले नाही. पायावर पाणी घालायला पण कोणी येईना. शेवटी सगळ्यात प्रेमळ उमा-सासूबाई पुढे आल्या. सगळ्यांनी घरात अबोला धरला. राहणं अगदी कठीण होत होतं, पण 'अग, तू का घाबरतेस? आपण काही चोऱ्या केल्या नाहीत, काही खून केले नाहीत, बोलतील नाहीतर बसतील, नाहीच आपल्याला सहन झालं तर दूर राहू.' अशा निर्मळ अंत:करणाने बोललेले शब्द तिला धीर देत असत. चार दिवसांनी जेव्हा दादा यमूला माहेरी घेऊन जाण्यासाठी आला तेव्हा कोंडी फुटली. सगळ्यांनी यथेच्छ बोलून घेतलं, सगळ्यांचा संताप बाहेर पडला. पण माहेरी मात्र धाडले नाही.

अशा परिस्थितीत राहून मनाचा कोंडमारा होत होता. सुट्टी संपून परत मुंबईला आल्यावर सुध्दा मनात काहूर चालले होते. पूर्व क्रम सुरू झाला. शनिवारी दुपारची सभा, वेगवेगळ्या विषयांवर चर्चा, परस्परांची मते ह्या सगळ्या गोष्टींचा यमूच्या म्हणण्यानुसार फार चांगला परिणाम तिच्या मनावर झाला होता. 'राक्षसी रूढींच्या आहारी जाऊन केवळ गुलामगिरीने जखडले जाऊन या लोकांनी कित्येक आनंद आपल्या हाताने घालविले 'असे वाटून यमूला खेद होत असे.'

असे आम्ही काय पाप केले आहे, की आम्हाला मोकळी हवा घेण्याची देखील सवड मिळू नये? आपल्या घराच्या बाहेर पाऊल टाकणे म्हणजे आपण नागाच्या फडीवर पाऊल टाकतो, हे प्राचीन काळी संस्कृत कवीने म्हटले, कारण बायकांनी घराच्या बाहेर जाऊ नये असे सुचवण्यासाठी. मी भगिनींना उपदेश करणार असा की बायांनो, घराच्या बाहेर पाऊल टाकणे म्हणजे नागिणीच्या फडेवर पाय; परंतु तसे करण्यास भिऊ मात्र नका. आपल्या दाराशी जी ही दुष्ट रूढीरूपी नागीण आज किती दिवस पसरली

आहे, तिला कोणीही-त्यांतून आपणां बायकांची तर गोष्ट विचारू नका-ओलांडून जायची तयारी करू लागला की तिने आपली प्रचंड फडा एकदम वर करून लाखो तोंडांनी त्याला दंश केलाच म्हणून समजा, अशी स्थिती आहे, तर आता घरात तरी किती दिवस बसायचे..... या सर्व गोष्टी ध्यानात धरा आणि आपल्या दाराशी निजलेल्या रूढीरूपी नागिणीच्या नरडीवर पाय देण्यासाठी एकमेकांचे हात बळकट धरून पुढे सरसावा.'

जनमनात ह्या रूढींविरूध्द जागृती निर्माण करण्यासाठी या व अशा अनेक उताऱ्यांचे दाखले देता येतील. श्रीं. आपटेंनी स्त्रियांच्या सद्यस्थितीचे वर्णन करून न थांबता पुढे काय केले पाहिजे याचे उदाहरण म्हणून रघुनाथराव व यमू व त्यांच्या स्नेह्यांच्या हकीगती, घरच्यांकडून होणारा विरोध आणि त्या सगळ्या विरोधाच्या धारेत उलट पोहून जायची जिद्द या पात्रांमधून साकारली आहे.

घरातून सतत टोचून बोलत असून सुध्दा केवळ रघुनाथरावांच्या आधारावर, प्रोत्साहनावर यमू खूप शिकली, सभा धीट होऊन आपले विचार परखडपणे मांडू लागली. या सगळ्याला तिच्या दादाचा सुध्दा एकप्रकारे पाठींबा होता. पण हे सगळं फार काळ चाललं नाही. एक दिवस अचानक रघुनाथरावांच्या छातीत दुखू लागले. आणि त्यांना रक्ताच्या गुळण्या येत राहिल्या व त्यातच त्यांचे निधन झाले. यमूच्या दुःखाला पारावार राहिला नाही. दादाबरोबर माहेरी जाण्याचे मनात होते पण ती ते करू शकत नव्हती, कारण रघुनाथरावांनी शेवटी 'आईला अंतर देऊ नको' ही ओळ तिच्या मनात घोळत होती. आहे त्या परिस्थितीशी जुळवून घेणे क्रमप्राप्त होते. तिच्या विचारांना काडीचीही किंमत न देणारे शंकरमामंजी, जुन्या रूढी उगाळणाऱ्या आजे सासू आणि काहीही आधार नसलेली सख्खी सासू व इतर सगळ्यांच्याबरोबर राहणे भाग होते.

त्याकाळात विधवांचे जीवन नरकमय असायचे आणि येता-जाता कोणीही काहीही बोलावे, वागावे असे. त्यातच यमुनावर सगळ्यांचा सुधारणावादी म्हणून भरपूर राग होता. कालपर्यंत स्वर्गसुखात असलेली यमू आज निराधार, दुःखी होती. विधवांना केशवपन करायची पध्दत होती; पण यमूचा आणि तिच्या दादाचा याला खूप विरोध होता. अशा ओंगळ चालीरीती सांभाळल्या नाहीत तर धर्म बुडत नाही. पण ती बधत नाही म्हणून तिचा छळ आरंभला. तिची लुगडी, दागदागिने आणि पतीची ५००० रू. ची विमा पॉलिसी तर केव्हाच शंकरमामांजीच्या ताब्यात गेली होती. तिने केशवपन केले नाही म्हणून तिला घरात काहीही करायची बंदी होती. स्वतःच्या सासूला खोकल्याची उबळ आली म्हणून पाणी द्यायला लागली तरी ते पाणी फेकून दिले जायचे. अतिशय करड्या पाहऱ्यात ती जगत होती.

पण ती एकटी ह्या सगळ्यांसमोर अपुरी पडली. आणि एक दिवस घरात फार लोकं नाहीत बघून शंकरमामांजींनी तिचे केस धरून तिला न्हाव्यासमोर उभे केले. आलवण नेसायला लावून स्वतःचा आत्मा शांत केला. या बळजबरीला कारण म्हणजे दरम्यानच्या काळात शंकरमामंजींची पहिली पत्नी

(पृष्ठ २२ वर पहा)

पश्चिम महाराष्ट्रातील ग्रामीण स्त्रियांचा क्षयविषयक सामाजिक दृष्टिकोन

सुधाकर मोराणकर व निशी सूर्यवंशी

"आम्ही ईश्वरइच्छेविरुध्द काहीही करु शकत नाही" - एक स्त्री क्षयरुग्ण

जगात दरवर्षी १५ ते ४४ वर्षे वयोगटातील प्रजननक्षम स्त्रियांचे दहा लाखाहून अधिक बळी जातात व त्याचे एकमेव कारण म्हणजे संसर्गजन्य 'क्षयरोग' (टी.बी.) होय.

अभ्यासाअंती असे दिसून आले की, मुख्यत्वे करून या रोगाने पीडिल असणाऱ्या स्त्रियांना घरामध्ये व समाजामध्ये दुय्यम स्थान आहे. यातही मुख्यतः घरातील सुनांचे प्रमाण अधिक आढळते. या लेखामध्ये स्त्रियांमधील क्षयविषयक सामाजिक दृष्टिकोनांचा ऊहापोह केला आहे. क्षयरोगामुळे स्त्रियांमध्ये आढळणारा सामाजिक दडपण व आर्थिक तणावांचा उपचार मिळण्यावर होणारा परिणाम पाहण्यासाठी पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागाँचा अभ्यास करण्यात आला. या अभ्यासामध्ये स्त्री- क्षयरूग्ण, गावातील लोक तसेच आरोग्य सेवा पुरविणारे यांचा प्रामुख्याने अंतर्भाव होता. या प्रश्नाचे उत्तर तितके सोपे नाही, पण क्षयपीडित स्त्रियांना आरोग्य सेवेकडून अधिक सेवेची अपेक्षा आहे, तथापि समाजाने या रोगाविषयी अधिक आशावादी होणं हेही खरं आव्हान आहे.

सत्याहत्तर टक्के स्त्री-क्षयरुग्ण 'तीव्र खोकला' हे लक्षण दिसल्यावरच उपचार घेण्यास सुरूवात करतात. त्यांच्या मतानुसार 'शारीरिक यातनाच' रोगाचं लक्षण आहे. तर इतर अठ्ठावीस टक्के स्त्रियांच्या दृष्टीने दुःख, चिंता हे रोगाशी निगडीत प्रश्न जास्त अस्वस्थ करणारे आहेत. गावातच उपचार घेणाऱ्या व घरातील लोकांचा आधार असणाऱ्या रुग्णांमध्येही मानसिक तणाव आढळतात.

कथन केलेल्या अनुभवांतून असे दिसून येते की, या स्त्रिया त्यांच्या पतीचे उपचार काळातील लैंगिक वर्तन तसेच दुसऱ्या स्त्री-बरोबर विवाहाची शक्यता याविषयी अधिक चिंतीत असतात. या चिंता व तणावामुळेच लवकर बरे होऊन घरी जाणे त्यांना भाग पडते. 'आपण पूर्ण बरे झालो' हा दाखला मिळणे व औषधांची खात्री यावर त्या अवलंबून असतात.

मुख्यत्वेकरून स्त्री-रूग्णांमध्ये लग्न झालेल्या सासूरवाशीण स्त्रिया अधिक आढळतात आणि त्यांना आपण क्षयाने पीडित आहोत हे लांच्छनास्पद वाटते. रोगाचे निदान होईपर्यंत सासरचे लोक त्यांच्यावर नेहमीचे उपचार करतात, पण टी.बी. (क्षय) आहे असे कळताच अशा मुलींना माहेरी पाठवून दिले जाते. एकत्र कुटुंबात राहणाऱ्या तीस टक्के स्त्रियांनी सांगितले की, त्यांच्या पतीव्यतिरिक्त इतर सर्व कुटुंबिय या रोगाविषयी अनभिज्ञ आहेत व त्या सतत 'आपल्या रोगाविषयी इतरांना कळेल काय' या भीती व दडपणाखाली वावरत असतात. या स्त्रियांपैकी

काहींनी सांगितले की, त्या आपल्याला 'अस्थमा (दमा)' असेल्याचा बहाणा करतात. एका रूग्णाने सांगितले, 'मी लोकांना सांगतो की, मी दम्यासाठी औषध घेत आहे.' काही रूग्ण दैवाला दोष देऊन ही 'देवाची इच्छा' असल्याने सांगतात. एका रूग्णाच्या म्हणण्यानुसार, 'मला पांडुरंगाच्या इच्छेनुसार हा आजार झाला व त्याच्या इच्छेनेच मी औषधे घेत आहे.' तथापि विभक्त कुटुंबामध्ये राहणारे रूग्ण त्यांना जोडीदाराकडून खूप आधार मिळाल्याचे सांगतात. अविवाहित मुली नेहमी गावापासून दूरच्या आरोग्य केंद्रातून उपचार घेतात, कारण आपल्याला रोग झाल्याचे उघड झाले तर आपल्याला जोडीदार मिळणे कठीण जाईल अशी भीती त्यांना सतावत असते. सतरा टक्के विधवा क्षयरूग्णांमध्ये प्रचंड भावनिक, मानसिक व आर्थिक तणाव असल्याचे दिसून आले आहे.

निम्म्याहून अधिक स्त्रिया, ज्यांना आपण क्षयरोगाने ग्रस्त आहोत हे माहीत आहे. अशा स्त्रिया आपण समाजाकडून नाकारले जाऊ व विभक्त पडू या भीतीने समाजापासून आपला आजार लपवितात, असे दिसून आले आहे. यापैकी दोन तृतियांश स्त्रियांनी या रोगामुळे आपला आत्मसन्मान गमावल्याचे सांगितले. ज्यांनी लग्न, मुले यांसारख्या कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडलेल्या आहेत अशा चाळीशी उलटलेल्या स्त्रियांना एकटेपणा जाणवतो व त्यांच्यात जगण्याची आणि बरे होण्याची उमेद नसते. टी.बी. कडे 'वाईट रोग' किंवा 'भयंकर गंभीर आजार' दृष्टिकोनातून पाहिले जाते. त्यामुळे तो बरा होईल, पण त्याचा काही ना काहीतरी अंश शरीरात राहतोच आणि भविष्यात तो पुन्हा उद्‌भवेल अशी उपचारांविषयीची भीती लोकांना वाटते. या दृष्टिकोनाचा स्त्री-रूग्णांच्या औषध घेण्यावर परिणाम होतो व काहीवेळेस त्यांचे डोस चुकतात. औषधोपचारातही त्यांच्याकडून कसूर होते.

उपचार घेण्याची प्रवृत्ती

या अभ्यासातील रूग्णांची उपचार घेण्याची प्रवृत्ती अनेक सामाजिक व सांस्कृतिक घटकांशी निगडीत आहे. तसेच डॉक्टरची फी, प्रवासखर्च इ. आर्थिक बाबींचाही यावर परिणाम दिसून येतो. साहजिकच समाजातील गरीब व दुय्यम स्थान असणाऱ्या स्त्रियांसाठी हा मोठाच अडथळा ठरतो. स्थानिक पातळीवर खाजगी डॉक्टरांकडून प्रथम मदत घेतली जाते, असे सांगितले जात असले तरी अशा घटकांमुळे स्त्रीला सरकारी आरोग्य यंत्रणेतच राहणं भाग पडतं.

DOTS (डॉट्स) (प्रत्यक्ष नियंत्रणाखाली) उपचार घेणाऱ्या रूग्णांना सहा महिने सलग दर दिवसाआड १५ कि.मी. प्रवास करणं भाग पडतं. बहुतांशी स्त्रियांनी (६९%) लहान मुलं, प्रवासखर्च, वाहतुकीच्या अडचणी, अशक्तपणा, थकवा यांसारख्या कारणांमुळे आरोग्य केंद्रामध्ये जाणं शक्य होत नसल्याचं सांगितलं. तसेच स्वतंत्र निर्णय घेणे, एकट्याने प्रवास करणे आणि स्वतःच्या आरोग्यासाठी पैसा खर्च करणं अशाप्रकारचे काही कौटुंबिक घटकही या वृत्तीला कारणीभूत असल्याचे सांगितले.

एकंदर पाहता दुर्लक्ष, आरोग्य सुविधांच्या उपलब्धतेचा अभाव, वेळ व आर्थिक अडचणी हे घटक रोगनिदान व उपचारास विलंब होण्यास

कारणीभूत असल्याचेही दिसून आले आहे.

रोगाचे कारण

वीस टक्क्यांहून अधिक स्त्रियांनी 'या अगोदरच्या आजारांमुळे क्षयरोग झाला' हे कारण सांगितले. 'मला खोकला व ताप होता; मी काहीं खात नव्हते, त्यामुळे मला अशक्तपणा आला आणि माझी रोगप्रतिकारशक्ती कमी झाली आणि शेवटी क्षय (टी.बी.) झाला,' हे त्यांचे स्पष्टीकरण आजाराच्या शास्त्रीय कारणांशी तंतोतंत जुळते.

इतर वीस टक्के स्त्रियांच्या मते मानसिक तणाव हे रोगाचे मुख्य कारण आहे आणि बहुतेकांच्या कुटुंबातील कुणी ना कुणी पूर्वी क्षयाचे शिकार होते. आश्चर्य म्हणजे टी.बी. (क्षय) हा रोग रूग्णाच्या निकट राहिल्याने वा संसर्गातून होतो याची सर्वांना जाणीव होती; पण रोगाविषयीच्या त्यांच्या स्पष्टीकरणातून 'रोगाच्या पुढील काळातली चिंता किंवा कौटुंबिक तणाव' हे घटक अधिक कारणीभूत असल्याचे दिसून येते. काहींनी असे सुध्दा सांगितले की, नातेवाईक किंवा मित्र म्हणून क्षयरूग्णाची काळजी घेतल्यामुळे आम्हाला या रोगाची लागण झाली आणि केवळ सामाजिक व सांस्कृतिक दबावामुळे त्यांना तसे करण्यास भाग पडले, असेही सांगितले.

जेव्हा त्यांची आरोग्यसेवेबद्दल अपेक्षा विचारण्यात आली तेव्हा त्यांनी क्ष-किरण तपासणी, थुंकी तपासणी, दवाखान्यात सहज प्रवेश उपलब्ध व्हावा या अपेक्षा व्यक्त केल्या. काही स्त्रियांनी उपचार करणाऱ्यांकडून नैतिक आधाराची गरज व्यक्त केली.

काही वेळा रूग्ण डॉक्टर बदलतात, कारण त्यांना डॉक्टरकडून वाईट वागणूक मिळते. त्यांच्या शंकांचे निरसन होत नाही, त्यामुळेही टी.बी. निदान व उपचारांबाबत कुठे जावे हे त्यांना समजत नाही. खाजगी डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार स्त्री-क्षयरूग्ण स्वतःच्या आजाराकडे होणारे दुर्लक्ष व आर्थिक अडचणींमुळे बऱ्याचदा घरगुती औषधेच वापरतात. समाजातील इतर लोकांची सुध्दा हीच मते आहेत. समाजाच्या क्षयरोगाकडे बघण्याच्या दृष्टिकोनाचा परिणाम त्यांच्या क्षयरूग्णाशी वागण्यावर होतो.

पुरूषांच्या मतानुसार 'जेव्हा स्त्री क्षयरूग्ण असल्याचे निदान होते तेव्हा तिची काम करण्याची शक्ती संपते व कुटुंबासाठी ती निरूपयोगी ठरते.'

समाजातील निरोगी स्त्रियांच्या मते, बऱ्याच क्षयपीडित स्त्रिया कुटुंब आणि समाजापासून वेगळे होण्याच्या मानसिक तणावात असतात, त्यामुळे त्या आजार लपविण्याचा प्रयत्न करतात. त्यांना स्वतःच्या मुलींसाठी मुलगा शोधणे तसेच सासरचे लोक व पती या सर्वांशी जुळवून घेणे कठीण वाटते.

निष्कर्ष

क्षयपीडित स्त्रियांमध्ये असुरक्षितता, समाजापासून व कुटुंबापासून आधार न मिळाल्याने विभक्तपणा तसेच मुलांना हा रोग होण्याची भीती याप्रकारचे मानसिक तणाव आढळतात, त्यामुळे त्यांचा आजार बरा होणे अवघड जाते. ज्या स्त्रियांना जोडीदाराकडून पुरेसा मानसिक आधार मिळतो त्यांचं मानसिक संतुलन चांगलं राहतं व त्या उपचाराच्या बाबतीत अधिक आशादायी असतात. म्हणूनच

क्षयनियंत्रण कार्यक्रमात कुटुंब व समाजाचा सहभाग अधिक महत्त्वाचा आहे.

स्त्री रूग्णांना आपला रोग उघड होईल की काय अशी भीती असते व म्हणून त्या पती व कुटुंबाच्या प्रतिक्रियेचा विचार करतात, शेवटी रोग अतिशय तीव्र होतो व त्या माहेरी पाठविल्या जातात. अशा स्त्रिया डॉक्टरांकडून भावनिक आधाराची अपेक्षा करतात. अशावेळी अशा रूग्णांना भावनिक आधार मिळेल अशी औपचारिक व्यवस्था ग्रामीण भागात असायला हवी. त्यासाठी प्रयत्न केले जावेत. या अभ्यासातून आपण या निष्कर्षाप्रत येऊ शकतो की कुटुंब, समाज तसेच डॉक्टर यांनी क्षयरोगाशी निगडीत भावनिक, मानसिक व सामाजिक प्रश्न समजून घेणं हाच रोगाचा मुख्य उपचार होईल.

रूग्ण व समाज या दोघांच्या शंकांचे निरसन करून त्यांचा क्षयरोगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यात ग्रामीण भागातील आरोग्य सेवकांनी महत्त्वाची भूमिका बजावली पाहिजे; आणि जर या शंकांचे निरसन झाले नाही, तर रूग्णांना व्यवस्थित उपचार मिळणार नाहीत. रूग्णांना पूर्ण उपचार घेण्यास प्रवृत्त करायला हवं, पण दुर्दैवानं अशा प्रकारचे प्रयत्न फारसे केले जात नाहीत.

विशेषतः आरोग्य सेवा जवळच्या अंतरावर उपलब्ध नसल्यामुळे क्षयपीडित स्त्री-रूग्णांना आरोग्य सेवा मिळण्यात अडचणी येतात. क्षयरोगामुळे आर्थिक व कौटुंबिक प्रश्न उद्‌भवतात आणि जरी उपचार दाराशी असले तरी समाजाचा त्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन त्यात अडथळा ठरतो. म्हणून क्षयरूग्णाची काळजी घेताना सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक भेदभाव दूर ठेवणे ही समाजाची मुख्य जबाबदारी आहे.

क्षयरोगावर नियंत्रण मिळविण्यासाठी समाजाला अधिक जबाबदार कसं बनविता येईल हेच खरं आव्हान ठरेल.

(अनुवाद - सचिन अत्रे) ००

(पृष्ठ १८ वरुन पुढे ...)

गेली होती, म्हणून त्यांनी दुसरा विवाह केला होता. स्वतःच्या मुलांपेक्षा सुध्दा लहान वयाच्या पत्नीला पदर आला होता आणि घरी गर्भदानाचा कार्यक्रम करायचा होता.

घरी विधवा आई विधवेसारखं न राहता उजळ माथ्याने वागते / राहते हे पाहून भटजी मिळेनासा झाला हे निमित्त. 'लोकं हसतात, आम्हाला नावं ठेवतात' ह्या व अशा अनेक सबबी पुढे केल्या गेल्या, पण स्वतःचा हेतू साध्य करून घेतला. सासूबाई कालांतराने वारल्यावर ती दादाकडे येऊन राहिली. वहिनी काय वाटेल ते बोलली तरी सहन करून राहिली. सगळं सहन करीत एक दिवस ती अनंतात विलीन झाली, पण मागे तिची आयुष्य-गाथा ठेवून गेली. त्यामागे एकच हेतू होता की अशा दुःस्थितीत असणाऱ्या स्त्रियांना लिहिता वाचता येऊन त्यांनी स्वतः किंवा दुसऱ्या स्त्रियांना सांगून स्वतःची समग्र चरित्रे लिहिली तर त्यांची स्थिती सुधारण्याचा एक मार्ग तयार होणार होता.

००

'पण लक्षात कोण घेतो !'
हरि नारायण आपटे, आर्यभूषण प्रेस, १९१०.

संस्था वृत्त

'आरोग्यविषयक जाणीव जागृती प्रकल्प', वेल्हे
ओळख व काही अनुभव

शिल्पा खळदकर

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेतर्फे, 'आरोग्यविषयक जाणीव जागृती' प्रकल्प ऑक्टोबर १९९९ मध्ये वेल्हे तालुक्यामध्ये सुरू झाला. प्रकल्प सुरू होऊन एक वर्ष पूर्ण होत आहे, त्या निमित्ताने प्रकल्पात आलेल्या अनुभवांचा ओझरता आढावा घ्यावा असे मनात आले. खरे पाहता, एक वर्षापूर्वी हा प्रकल्प सुरू होण्याआधी पुण्यासारख्या विद्येचे माहेरघर समजल्या जाणाऱ्या शहरापासून केवळ ६५ कि.मी. अंतरावर वेल्हे नावाचा तालुका अस्तित्वात आहे, जो वरवर पाहता ग्रामीण भाग गणला जातो; परंतु ज्याचे राहणीमान व वस्ती मात्र आदिवासी भागासारखीच आहे, असे जर कोणी सांगितले असते तर कदाचित माझा विश्वास बसला नसता. परंतु या प्रकल्पामध्ये काम करायची संधी मिळाली आणि वेल्हे तालुक्यातील एका संपूर्ण ऋतुचक्राचा, लोकांच्या जीवनमानाचा तसेच त्यांच्या आरोग्याविषयक समस्यांचाही अनुभव घेता आला.

पुणे-सातारा महामार्गावरील चेलाडी फाट्याकडून नसरापूर गावाकडे वळल्यावर अंदाजे ३०-३५ कि.मी. अंतरावर तोरणागडाच्या पायथ्याशी वेल्हे हे तालुक्याचे गाव आहे. राजगड व तोरणागड या शिवकालीन किल्ल्यांचा ऐतिहासिक वारसा येथील भागाला मिळाला आहे. ह्या तालुक्याची लोकसंख्या अवघी ४५-५० हजार. स्वारगेट-वेल्हा एस.टी. ची वाहतूक फक्त मुख्य रस्त्यावरून होते. तालुक्यातील गावे मात्र मुख्य रस्त्यापासून दोन्ही बाजूस १ ते ४ कि.मी. अंतरावर डोंगर पायथ्याशी वसलेली आहेत. दोन्ही बाजूंकडील गावांच्या मधून 'कानंदी' नदी वाहते. याच नदीवर सध्या धरणाचे काम चालू आहे. पुणे जिल्ह्यात सर्वात जास्त पाऊस वेल्हे तालुक्यात पडतो, मात्र उन्हाळ्यात पाणी टंचाईसुद्धा याच तालुक्याला जास्त भेडसावते. येथील लोकांचा भातशेती हाच मुख्य व्यवसाय. पण काही लहान-मोठ्या गावांमध्ये शेती व्यवसायबरोबरच दूध विकण्याचा धंदाही सुरू आहे. आमचा प्रकल्प सुरू होण्यापूर्वी वेल्हे तालुक्यामध्ये संस्थेतर्फे पहिली सभा शुक्रवार दिनांक २९ ऑक्टोबर १९९९ रोजी सावित्रीबाई फुले सभागृह, पंचायत समिती, वेल्हे येथे झाली. या सभेचे उद्घाटन पंचायत समितीचे सभापती मा. श्री. रघुनाथ कथुरे यांचे हस्ते झाले. सभेस उपसभापती सौ. बेबीताई कोंडीतकर, गटविकास अधिकारी श्री. अरूण गलांडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अनिल जोशी, माजी गटविकास अधिकारी श्री. मा. तु. खुटवड, वेल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते श्री. शंकर भुरूक व श्री. एन. डी. धायगावेपाटील तसेच तालुक्यातील गावांचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य इत्यादी मान्यवर मंडळीही उपस्थित होती. संस्थेची तसेच संस्थेच्या कार्यपद्धतीची ओळख आम्ही उपस्थितांना करून दिली. नंतर संस्थेतर्फे वेल्हे तालुक्यात सुरू करण्यात येणाऱ्या भारत सरकारच्या 'आरोग्य विषयक जाणीव जागृती' कार्यक्रमाची माहिती करून दिली.

या सभेमध्ये वेल्हे तालुक्यांतील आरोग्यविषयक समस्यांची चर्चा झाली. सभापती श्री. रघुनाथ कथुरे यांनी तरूणांचे आरोग्य या मुद्द्यावर भर दिला. ते म्हणाले की, वेल्ह्यामधील तरूणांचे पुण्या- मुंबईसारख्या शहरांकडे स्थलांतराचे प्रमाण वाढत आहे. डोंगराळ भाग व पाऊस जास्त असूनही पाण्याची योग्य प्रकारे साठवणूक नसल्यामुळे उत्पन्न कमी म्हणून तरूण मुले शहराकडे

(डावीकडून डॉ. जोशी, चंद्रकांत शेंडकर, सभापती श्री. कथुरे, बीडीओ श्री. गलांडे व डॉक्टर परदेशी)

या सभांमध्ये श्री. खुटवड उपस्थित लोकांना विचारत की 'स्त्री सासरी येताना काय बरोबर घेऊन येते?' उत्तर देताना ते म्हणत, 'शिक्षण व आरोग्य या दोन गोष्टी ती सासरी आणते.' असे सांगून ते स्त्रीच्या शिक्षणाचे व आरोग्याचे महत्त्व पटवून देत असत. ह्या चर्चांमध्ये जवळजवळ प्रत्येक गावातील स्त्री-पुरूष एड्सवर माहिती मिळण्यासाठी उत्सुक दिसले. परंतु त्या उत्सुकतेबरोबरच भीतीचाही अंश होता. एड्सविषयी वाटणाऱ्या भीतीचे कारण आम्हाला लवकरच कळून चुकले. तालुक्यातील प्रत्येक गावातील बरीचशी तरूण मुले पुणे, मुंबई सारख्या शहरांमध्ये विविध प्रकारची कामे करतात. गावातील लोकांना टी.व्ही, रेडिओ, वर्तमानपत्रे या प्रसार माध्यमांद्वारे एड्सविषयक माहिती मिळत आहे. त्यामुळे गावातून शहराकडे वळणाऱ्या आपल्या तरूण पिढीची त्यांना लागलेली काळजी त्यांच्या बोलण्यातून जाणवते. त्यामुळे एखादा तरूण मुलगा गेला तर तो कशाने गेला हे कारण पुरते जाणून न घेताच, त्याला खांदा दिला तर आपल्यालाही एड्स होईल ह्या भीतीने अंत्यसंस्कार करण्यासही लोक कचरतात, हे चर्चा करत असताना काही लोकांनीच आम्हाला सांगितले. यावरून एक लक्षात येईल की, रोगाच्या प्रसाराच्या कारणांचा प्रचार करताना त्याची योग्य माहिती लोकांपर्यंत पोहोचणे

वळत आहेत. म्हणून एड्स व गुप्तरोग यांचे प्रमाणही वाढत आहे. एड्सला प्रतिबंध, लोकसंख्या वाढीला आळा व महिला आरोग्य हे सर्वात महत्त्वाचे प्रश्न असून यावर जनजागृतीची आवश्यकता आहे. लोक सहभागातून यावर तोडगे काढणे गरजेचे आहे. लोकांचे प्रश्न लोक स्वतःच सोडवतील असा आत्मविश्वासही त्यांनी प्रकट केला. दारिद्र्य, स्त्रीचे अज्ञान, लोकसंख्यावाढ, भारतीय संस्कृतीचा ऱ्हास, व्यसनाधीनता, टी. व्ही. संस्कृती, एड्स इत्यादी विषयांवरही प्रत्येकाने आपापले मत मांडले.

ऑक्टोबरमध्ये जरी प्रकल्प सुरू झाला असला तरी कामाला खरा वेग नोव्हेंबर महिन्यात येऊ लागला. प्रकल्पामध्ये चौदा गावे समाविष्ट आहेत. या गावांतील लोकांचे आरोग्यविषयक प्रश्न समजून घेता यावेत म्हणून संस्थेचे अध्यक्ष प्रा. श्री. रा. के. मुटाटकर, स्त्रीरोग तज्ञ सौ. कल्पना मुटाटकर, सचिव डॉ. सुधाकर मोराणकर, सहसचिव श्री. पुरूषोत्तम आगाशे, वेल्ह्याचे माजी गटविकास अधिकारी श्री. मा. तु. खुटवड, श्री. श्रीनिवास इंदापूरकर, श्री. गणपत पंडित, श्री. प्रेमानंद सावंत, श्री. अभय कुदळे असे सर्वजण प्रत्येक गावी रात्री राहून लोकांशी चर्चा करू लागलो.

(उद्घाटन प्रसंगी तालुक्यातील उपस्थित मान्यवर व ग्रामस्थ)

किती गरजेचे आहे.

नोव्हेंबरमध्ये सर्व गावांमध्ये रात्रीच्या वेळी सभा घेऊन गावकऱ्यांना संस्थेची व प्रकल्पाची ओळख करून दिली. त्याचवेळी सर्व ग्रामस्थांनी मिळून, आपल्या गावातील सर्व थरांतील व सर्व वयोगटांतील लोकांपर्यंत आरोग्यविषयक माहिती देण्यासाठी, गावातर्फे एक स्त्री व ज्या गावाची लोकसंख्या जास्त आहे तेथे स्त्री बरोबरच एक पुरूष आरोग्य मार्गदर्शक निवडून द्यावेत असा प्रस्ताव गावापुढे ठेवला. संस्थेचे काम संपले तरी प्रत्येक गावामध्ये कायम स्वरूपी आरोग्याची माहिती असलेली व्यक्ती उपलब्ध राहावी, गाव माहिती मिळण्यासाठी संस्थेवर अवलंबून राहू नये असा उद्देश ह्या प्रस्तावामागे होता. आरोग्यमार्गदर्शक म्हणून काम करणारी स्त्री, गावातील सून असावी, तिला लिहिता वाचता येत असले पाहिजे व ती गावात मिसळणारी, बोलकी असावी ह्या गोष्टी गावकऱ्यांनी आरोग्य मार्गदर्शक निवडताना लक्षात घ्याव्यात, तसेच स्वयंसेवी वृत्तीने पुढे येणाऱ्या व्यक्तीचा मान ठेवण्यासाठी आम्ही अल्पसे मानधन देऊ असे समजावून दिले गेले.

पाबे, दापाडे, मालवली, लाशिरगाव, वेल्हे खुर्द, कोंढावळे बुद्रुक इत्यादी गावांमध्ये आम्हाला आरोग्य मार्गदर्शक मिळण्यास फारसे कष्ट पडले नाहीत. परंतु काही गावांमध्ये महिला 'मी हे काम करीन' असे आधी सांगून काही दिवसांनी मी प्रशिक्षणासाठी येणार नाही असे सांगत होत्या. त्यामागची कारणे काय आहे हे शोधताना असे दिसून आले की त्यांना सासू, सासरे काम करण्याची परवानगी देत नव्हते. काही ठिकाणी, महिलेचा पती 'मी कमावत असताना तुला घराबाहेर पडायची काय गरज?' असे दटावून तिला घरी बसवत होता. परंतु या महिलांच्या मनात मात्र आपणही गावासाठी काही करावे, आपल्या ज्ञानामध्ये आणखी भर पडावी अशी इच्छा होती. आपण शिक्षण घेऊनही घराबाहेर पडू शकत नाही अशी खंतही त्यांना वाटत होती. महिलांपेक्षा प्रकल्पासाठी पुरूष आरोग्य मार्गदर्शक मिळणे फारच कठीण गेले. काही गावांतील पुरूष प्रत्येकवेळी 'मी येईन' असे सांगून प्रशिक्षणासाठी कधीही आले नाही. आमच्या प्रकल्पातील वांजळे या गावात दहा महिने झाले तरी आम्हाला पुरूष मार्गदर्शक मिळू शकले नव्हते. गावासाठी वेळ काढून स्वयंस्फूर्तीने काही काम करावे अशी भावना फारच थोड्या लोकांमध्ये दिसून आली. ह्या सर्व कारणांव्यतिरिक्त गावातील दोन गट, वेगवेगळ्या वाड्या, जातीभेद, राजकीय मतभेद, स्त्रीचे घरातील स्थान हे घटकही आरोग्य मार्गदर्शक निवडताना आड येत असत. हे सर्व अनुभवताना, 'लोकसहभागातून आरोग्य प्रकल्प' (Community participation in health programmmes) उभे करणे ही गोष्ट पुस्तकात वाचताना किती सोपी असते; परंतु प्रत्यक्षात मात्र एक प्रदीर्घ व गुंतागुंतीची प्रक्रिया असते हे आम्हाला जाणवले.

नोव्हेंबर व डिसेंबर या दोन महिन्यात गावासाठी काम करण्यास आम्हाला स्त्री व पुरूष आरोग्य मार्गदर्शक मिळाले. डिसेंबर महिन्यातच वेल्हे येथे दिनांक ११, १२, १३ रोजी तीन दिवसांचे पहिले प्रशिक्षण शिबीर झाले. ह्या शिबिरामध्ये आरोग्यविषयक विविध विषय हाताळले गेले. प्रा. रा. के. मुंटाटकर यांनी आरोग्य मार्गदर्शकांना प्रशिक्षणाचे व त्यामध्ये घेतल्या जाणाऱ्या विषयांचे महत्त्व समजावून दिले. श्री. पुरूषोत्तम आगाशे यांनी किशोरवयीन मुला-मुलींचे आरोग्य, शारीरिक व मानसिक बदल या विषयांवर चर्चा करताना शारीरिक स्वच्छता, योग्य आहार यांचे महत्त्व पटवून दिले. किशोरवयातील मुलामुलींची वागणूक जबाबदारीची असणे कसे गरजेचे आहे हे सांगताना त्यांनी एड्सची माहितीही

दिली. शारीरिक बदल, स्त्री व पुरूष शरीर रचना, मासिकपाळी, गरोदरपण या विषयांवर डॉ. सौ. कल्पना मुटाटकर यांनी चर्चा केली. स्त्रीची शरिररचना समजावून देण्यासाठी त्यांनी गर्भाशयाचे रबरी मॉडेल आणले होते. गर्भाशय कसे असते हे बघण्यासाठी ते मॉडेल आरोग्यमार्गदर्शकांना हातात घेण्यास सांगितले; परंतु कोणीही त्यास हात लावण्यास तयार होईना. नंतर आयुर्वेद शास्त्राप्रमाणे शरीररचना डॉ. अमिता पित्रे यांनी अतिशय सोप्या भाषेत आरोग्य मार्गदर्शकांना समजावून दिली. गरोदरपणातील काळजी, तपासणीचे व आहाराचे महत्त्व, गरोदरपणातील धोक्याची लक्षणे इत्यादी विषयांवर मी माहिती सांगितली, माहिती ऐकल्यावर महिला म्हणाल्या, 'आमच्याकडे गरोदर महिला आपणहून तपासणीसाठी जात नाहीत. काही त्रास होऊ लागला तरच डॉक्टरकडे जातात. लोहाच्या गोळ्याही खात नाहीत कारण, त्यामुळे बाळाची खूप वाढ होते, वारही वाढते व बाळंतपणात त्रास होतो असे म्हणतात.

गरोदर स्त्रीला पपई, केळी, शेंगदाणे, शेवग्याचा पाला खाऊ देत नाहीत, कारण ते खाल्ले तर गर्भपात होतो असे मानले जाते'. त्यांच्या शंकांचे निरसन करून आम्ही पुढील विषयाकडे वळलो. वेल्हे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील सिस्टर सौ. वाडकर बाळंतपण या विषयावर बोलल्या. बाळंतपणाची क्रिया समजावून देऊन बाळंतपणातील स्वच्छतेचे महत्त्वही त्यांनी पटवून दिले. सोबत आणलेला बाळंतपणाच्या साहित्याचा संच दाखवून त्याचा उपयोग सांगितला. बाळंतपणानंतरची बाळ बाळंतीणीची काळजी, स्तनपानाचे महत्त्व यांवर चर्चा करत असताना, डॉ. अमिता पित्रे यांनी आयुर्वेद शास्त्रानुसार बाळाची व आईची देखभाल, धुरीचे महत्त्व, डिंकाच्या लाडूमधील खसखस व इतर घटकांमुळे आईला दूध जास्त येते, तेल मसाजाचे महत्त्व समजावले.

दुसऱ्या दिवशी डॉ. कल्पना मुटाटकर यांनी वंध्यत्वाची, गर्भपाताची आणि जननमार्ग जंतुसंसर्गाची कारणे हे विषय हाताळले. डॉ. अमिता पित्रे यांनी या जंतुसंसर्गावरचे घरगुती उपचार सांगितले. श्री. प्रेमानंद सावंत यांनी कुटुंबनियोजनाचे महत्त्व व त्यासाठी वापरात येणारी साधने यावर चर्चा केली. मार्गदर्शकांना तांबी, माला-डी व निरोध ही साधने माहीत होती, परंतु त्यांनी सांगितले की, 'गावात ह्या साधनांचा विशेष वापर होत नाही. मुलगा झाला की एकदम केली जाते. वेल्हे येथील तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अनिल जोशी यांनी लहान मुलांचे आरोग्य, मुलांचे आजार या विषयांवर चर्चा केली. जुलाब व न्यूमोनिया या आजारांची कारणे, गंभीर लक्षणे, त्यावरील उपाय यांवर विस्तृत माहिती दिली. प्रजनन व बाल आरोग्य या सरकारच्या प्रकल्पाअंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये असणाऱ्या सुविधा उदा. लसीकरण, जलसंजीवनीची पाकिटे, गरोदर महिलांना लोह गोळ्या व धनुर्वाताचे इंजेक्शन इत्यादींची उपयुक्तता लक्षात आणून दिली.

तिसऱ्या दिवशी पुणे विद्यापीठातील आरोग्यकेंद्रातील डॉ. दिपक फाल्गुने यांनी एच्.आय्.व्ही./ एड्स व गुप्तरोग याबद्दलची शास्त्रीय माहिती दिली. रोगांची कारणे, लक्षणे, उपचार यांवर चर्चा केली.

तसे पहायला गेले तर हे सर्वच विषय प्रत्येकाला जुनेच होते; परंतु त्यामागची शास्त्रीय माहिती मात्र नवी होती. यातील शरीररचना, मासिक धर्म, गरोदरपण असे विषय स्त्रियांना पुरूषांसमोर तसेच पुरूषांना स्त्रियांसमोर ऐकताना अतिशय अवघडल्यासारखे होत होते. हे शिबीर चर्चा स्वरूपात होऊ दे, असे सांगूनही कोणी फारसे बोलायला तयार होत नव्हते. मात्र विहीर या गावातून आलेल्या इंदूबाई इतर सर्वांपेक्षा वयाने थोड्या

मोठ्या व बोलक्या होत्या. त्यांनी बाळंतगुटी, आयुर्वेदाप्रमाणे गरोदरपणातील, बाळंतपणातील आहार, डिंकाच्या लाडूचे महत्त्व, धुरी का घेतात? हे सर्वांना समजावून दिले. आणि पुढे शेरा मारला 'आजकालच्या सुनांना या गोष्टींपेक्षा टॉनिकवर जास्त विश्वास'.

ह्या प्रशिक्षणानंतर दर महिन्यातून एकदा आम्ही प्रशिक्षणासाठी जमायचे ठरवले. तेच तेच विषय पुन्हा हाताळले गेले. विषयाला अनुसरून असणाऱ्या, गावांमधील विविध घटनांची व घडामोडींची चर्चा करत गेलो आणि बोलायला लाजणारे आरोग्य मार्गदर्शक, हळूहळू बिनदिक्कत एकमेकांसमोर सर्व विषयांवर चर्चा करू लागले. तरीही प्रशिक्षणामध्ये बोलणारे मार्गदर्शक गावांमध्ये गटचर्चा करायला लाजत होते, घाबरत होते. डिसेंबरमधील प्रशिक्षणानंतर मी प्रत्येक गावात जाऊ लागले. आरोग्य मार्गदर्शकांना घेऊन गावांमध्ये गटचर्चा करू लागले. सुरूवातीला औषध मिळणार नाही म्हणून न जमणाऱ्या महिला दोन तास गटचर्चा करू लागल्या. मी स्वतः गावात जाऊन, आरोग्य मार्गदर्शकांबरोबर गटचर्चा घेतल्यामुळे; आरोग्य मार्गदर्शकांना गावांमध्ये स्वतः बोलण्यासाठी सुरूवात करण्यास त्रास झाला नाही, कारण लोकांना माहितीचे महत्त्व पटत गेल्यामुळे लोक स्वतःहून मार्गदर्शकांकडे गटचर्चा घेण्याची मागणी करू लागले. प्रशिक्षणाहून घरी गेल्यावर, 'आज काय शिकून आलात?' असे आपणहून विचारू लागले. यामुळे आपण गावापुढे बोलू शकतो असा आत्मविश्वास हळूहळू त्यांना येऊ लागला. प्रशिक्षणाच्या वेळी दिली गेलेली मासिकपाळी, गरोदरपण, गरोदरपणातील काळजी ही चित्ररूपातील शास्त्रीय माहिती देणारी पुस्तके गावातील सुना, पुरूष तसेच तरूण मुले व मुलीही वाचण्यासाठी नेऊ लागले. शिवाय इतर विषयांवरची पुस्तकेही 'आम्हाला वाचण्यासाठी द्या' अशी मागणी मी गावात गेल्यावर या तरूण मुली करू लागल्या.

आम्ही प्रत्येक गावातून महिलांशी चर्चा करण्यासाठी, त्यांची आरोग्यविषयक माहिती व प्रश्न जाणून घेण्यासाठी जाऊ लागलो. त्यावेळी त्या महिला, 'आपल्या गावात कोणीतरी डॉक्टर आली आहे आणि ती आपल्या दुखण्यावर गोळ्या देईल' ह्या अपेक्षेने माझ्याजवळ जमत. परंतु माझ्याजवळ गोळ्या नाहीत हे समजताच, 'आम्हाला गोळ्या देणार असाल तर थांबतो, नाहीतर तुमचे बोलणे ऐकत कशाला थांबायचे?' असे म्हणत त्या तेथून पोबारा करत. औषधे, गोळ्या, इंजेक्शन, सलाईन आणि डॉक्टर म्हणजेच आरोग्य, हेच त्यांचे आरोग्याचे समीकरण आहे, हे मला त्यांच्याशी बोलताना जाणवले. अशक्तपणा वाटला की वेळ्याला दवाखान्यात जाऊन आम्ही सलाईन भरतो, असे कितीतरी स्त्रियांनी मला सांगितले. औषधे व गोळ्यांपेक्षाही त्यांचा इंजेक्शनवर अधिक विश्वास. रोग होऊ नये म्हणूनही काही गोष्टींची आधीच काळजी घ्यायला पाहिजे, रोगाला आपण प्रतिबंधही करू शकतो. या गोष्टींकडे कधी अज्ञानीपणामुळे तर कधी जाणूनबुजून त्यांचे दुर्लक्ष होत आहे, हे त्यांच्या निदर्शनास आणून दिल्यावर आणि त्यामुळे त्यांचा पैशाचा व वेळेचा होणारा अपव्यय सांगितल्यावर महिलांना आरोग्यशिक्षणाचे व रोग प्रतिबंधक उपायांचे महत्त्व पटू लागले आहे. आता त्या, 'ताई तुम्ही परत आमच्या गावाला कधी येणार' असे विचारू लागल्या होत्या.

महिला आम्हाला त्यांची दुखणीखुपणी सांगत असत. त्यामध्ये प्रामुख्याने कंबरदुखी, पाठ व पाय दुखणे, डोके दुखणे आणि संधीवात ह्या आजारांचे प्रमाण अधिक होते; परंतु त्यामागची कारणेही तशीच होती. सकाळी चार वाजल्यापासून रात्री दहा वाजेपर्यंतच्या या स्त्रियांच्या कामाची यादी पाहिली तर हे आजार न होतील तरच नवल. सकाळी धारा काढणे, गोठा साफ करणे, स्वयंपाक करणे, पाणी आणणे, गुरांना चारा घालणे, शेतीची कामे,

इत्यादी सर्व जबाबदारी स्त्रीची. परंतु या सर्व कामांसाठी लागणाऱ्या सकस आहाराकडे मात्र दुर्लक्ष होते. घरामध्ये गाई, म्हशी असूनही बिनदुधाचा चहा पिऊन दूध विकले जाते. तसेच दोन तरी मुलगे हवेत ह्या हौसेपायी स्त्रीची चार ते पाच बाळंतपणे होतातच. काही चुकीच्या समजुतींमुळे गरोदरपणात व बाळंतपणात हवी ती काळजी घेतली जात नाही. या सर्व गोष्टी खुलासेवार सांगितल्या की त्यांना पटत होत्या; परंतु त्या बदलण्यासाठी सुरूवात कोणी व कुठून करायची? स्त्रियांचे काही खास आरोग्यविषयक प्रश्नही चर्चिले जात होते. अशा आजारांकडे दुर्लक्ष केले, वेळीच उपाय केले नाहीत तर वाईट परिणाम होतात, हे समजावून दिले की त्यावर त्या म्हणत 'असे आजार पुरूष डॉक्टरांना सांगायला लाज वाटते, वेल्ह्याला महिला डॉक्टर नाही, आम्ही काय करू?' या गोष्टींवरून एक कळते की जेव्हा आपण ग्रामीण स्त्रीचे आरोग्य सुधारण्याविषयी बोलतो तेव्हा प्राथमिक आरोग्य केंद्रात स्त्री रोगतज्ञ महिला डॉक्टर असणे खूपच अत्यावश्यक आहे. तसेच सर्वच गावातील लोकांचा सरकारी दवाखान्यापेक्षा खाजगी डॉक्टरकडे ओढा अधिक दिसून आला. सरकारी दवाखान्याबद्दलच्या या अनास्थेचे मूल्यमापन होणे व वर्तमान आरोग्य यंत्रणेत आवश्यक ते फेरबदल होणेही गरजेचे आहे.

उत्तम आरोग्य पुरेशा सकस आहारावर अवलंबून आहे. वेल्ह्याच्या बाजारात कोणकोणत्या भाज्या मिळतात, हे पाहण्यासाठी आम्ही दर शुक्रवारी भरणाऱ्या वेल्ह्याच्या बाजारात गेलो. तेथे तऱ्हेतऱ्हेच्या भाज्यांची, धान्य व कडधान्यांची रेलचेल दिसली. कशाचीही उणीव तिथे दिसत नव्हती. मग आहाराचा विषय मी गावामध्ये चर्चेस घेतला, तेव्हा त्यातून असे दिसून आले की भाज्या, फळे, धान्य इत्यादींचा आपल्या शरीराला कसा उपयोग होतो ते महिलांना माहीत नव्हते. आपल्या शरीरातील हाडांचा आणि आपल्या आहाराचा काहीतरी संबंध आहे हे त्यांना कळत नव्हते. हळूहळू काही तरूण महिलांना आहाराचे महत्त्व पटू लागले. काही वयस्कर स्त्री-पुरूष चर्चेत भाग घेऊन सांगू लागले, 'आत्ताच्या अन्नधान्याला पूर्वीसारखा कस राहिलेला नाही, कारण खतांचे प्रमाण वाढले'. गावागावांतून फिरताना आणखी एक गोष्ट निदर्शनास आली, ती म्हणजे सर्वत्र वाहणारे सांडपाणी. या वाहत्या सांडपाण्यावर तुम्हाला घरच्या घरी परसबाग तयार करता येईल, अशी कल्पना महिलांसमोर मांडल्यावर 'हे कोण करणार?' असे म्हणून त्यांनी सोयीस्करपणे दुर्लक्ष केले.

वेल्हा भाग औषधी वनस्पतींनी संपन्न आहे. काही गावातील वयस्कर महिला उदाहरणार्थ, मालवलीगावच्या राहीबाई शेंडकर, बऱ्याचशा आजारांवर अगदी तोंडपाठ घरगुती औषधे सांगतात. परंतु या सर्वच महिलांची ही खंत आहे की तरूण पिढीचा झाडपाल्याच्या औषधांवर विश्वास नाही, त्यांना औषध व टॉनिक लागते. वेल्हे भागामध्ये, लहान मुलांमध्ये मुख्यतः सर्दी, खोकला, ताप, जुलाब, पोटदुखी इत्यादी आजार जास्त आढळतात, परंतु ज्या भागामध्ये जो आजार जास्त त्याच भागामध्ये त्या आजाराचे औषधही निसर्गाने निर्माण केले आहे. सर्दी खोकल्याचे प्रमाण या भागात जास्त, परंतु आयुर्वेदानुसार ह्या आजारावर उत्तम उपाय असणारी 'अडुळसा' ही औषधी वनस्पती देखील मुबलक प्रमाणात आढळते. मात्र पूर्वीच्या औषधी वनस्पतींचे व इतर घरगुती उपायांचे ज्ञानभांडार आता नष्ट होत चालले आहे. कारण तरूण पिढीला इंजेक्शनसारखे झटपट उपाय हवेत. त्यांचा जुन्या औषधींचा वापर कमी होत चालला आहे. ग्रामीण आरोग्य यंत्रणेमध्ये औषधी वनस्पतींचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. अर्थात औषधी वनस्पतींवर अधिक संशोधन मात्र व्हायला हवे, कारण ग्रामीण स्त्री-पुरूषांना आयुर्वेदाचीच भाषा समजते.

वयात येणाऱ्या मुला-मुलींचे आरोग्य हाही एक जिव्हाळ्याचा; परंतु संवेदनाक्षम विषय. आरोग्यविषयांवर बऱ्याच किशोरवयीन मुलींशी बोलण्याची संधी मिळाली. दापोडे हायस्कूल, वेल्हा हायस्कूल, विंझरचे अमृतेश्वर कॉलेज येथे आम्ही वयात येणाऱ्या मुला मुलींच्या आरोग्यविषयक प्रश्नांवर चर्चासत्रे घेतली. याकामी दापोडे हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. ओतारी सर, वेल्हा हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. मोहिते सर, जाधव सर, विंझर कॉलेजचे प्राचार्य श्री. केंजळे सर व श्रीमती कुलकर्णी मॅडम यांचे खूपच चांगले सहकार्य लाभले. माझ्याशी ओळख वाढल्यावर अनेक मुलींनी न लाजता सर्व विषयांवर मला प्रश्न विचारले. स्वतःच्या शरीरात होणारे बदल व त्याची शास्त्रीय कारणे जाणून घेण्याची इच्छा त्यांच्या डोळ्यांमधून प्रकट होत होती. बाहेरच्या जगाशी संपर्क अतिशय कमी असल्यामुळे आपले ज्ञान त्रोटक आहे, अशी खंतही त्यांना वाटत होती. एड्सची माहिती त्यांना हवी होती. या तरूण मुलींचीही इच्छा आपले लग्न लवकर होऊ नये अशी आहे; परंतु आईवडिलांना आपल्या मुलीची सुरक्षितता जास्त महत्त्वाची वाटते. याच धर्तीवर विचार करता जाणवत होते की, फक्त शाळेमध्ये लैंगिक शिक्षण मिळणे त्यांच्या दृष्टीने गरजेचे नाही, तर या किशोरवयीन मुलामुलींमध्ये व त्यांच्या पालकांमध्ये सुसंवाद निर्माण होऊन विश्वासाचे नाते तयार होणे त्याहूनही अधिक आवश्यक आहेत. आणि तसे झाले तर ही तरूण पिढी आरोग्यसंपन्न बनेल.

आरोग्य मार्गदर्शकांना गावासाठी काम करताना सर्व ग्रामस्थांचे अधिकाधिक सहकार्य मिळावे म्हणून एप्रिल महिन्यामध्ये पुन्हा पुन्हा आम्ही रात्रीच्या वेळी सभा घेतल्या. तसेच सर्व गावांतील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शिक्षक, बालवाडी शिक्षिका, दाई, महिला मंडळ, तरूण मंडळ अध्यक्ष, वैदू आणि इतर प्रतिष्ठीत नागरिक यांची एक सभा, वेल्हे येथे घेतली. मालवलीच्या प्रशिक्षित दाई श्रीमती राहीबाई शेंडकर यांनी वेळोवेळी प्रकल्पाला मदत केली. एका प्रशिक्षणाला त्या हजर असताना दर महिन्याला स्त्रीच्या गर्भाशयात स्त्रीबीज कधी निर्माण होते? व कधी संबंध आला असता तिला दिवस कधी राहू शकतात? अशा विषयांवर चर्चा चालू होती. शास्त्रीय दृष्टिकोनातून स्त्रीबीज मासिक पाळीनंतर दहा अकरा दिवसांनी तयार होऊन गर्भाशयात येते. परंतु असे असले तरीही जोडप्यांना आपण सारख्याच नियमात बांधू शकत नाही. असे ऐकल्यावर राहीबाई म्हणाल्या, हे बरोबरच आहे, आणि त्यांनी समर्पक उत्तर दिले, ते असे -

वळीवाचा ग पाऊस, पडत नाही वेळोवेळा
मोत्यापोवळ्याचा सरवा, सापडेल त्याने घ्यावा.

म्हणजेच वळवाच्या पावसाच्या सरी, कधी पडतील व कधी पडणार नाहीत हे जसे आपण सांगू शकत नाही तसेच स्त्रीबीज कोणामध्ये नक्की कोणत्या दिवशी तयार होऊन गर्भाशयात येईल हे सांगता येणार नाही. त्यामुळे गर्भधारणेला मोत्या, पोवळ्याची उपमा देऊन त्या म्हणतात, हा मौल्यवान क्षण ज्याला सापडेल तसा त्याने घ्यावा.

गावांतून गटचर्चा घेत असतानाही चांगल्या प्रसंगांबरोबरच काही वाईट प्रसंगातूनही मला जावे लागले. एका गावात, सहा-सात गरोदर स्त्रियांना एकत्र जमवून अम्ही गरोदरपणातील काळजी, तपासणीचे महत्त्व, धोक्याची लक्षणे अशा विषयांवर चर्चा करत असतानाच एका महिलेची सासू जोरजोरात बडबड करत आमच्या जवळ आली. ही सासू आधी तिच्या सुनेबर डाफरू लागली की, 'तू गरोदर आहेस हे तुला कोणी सांगितले?' गावभर गरोदर आहेस म्हणून का सांगत फिरतेस? इथे कशाला येऊन बसली?' मग तिने आमच्या मार्गदर्शक

ताईवर व माझ्यावर तोफ डागली की, 'तुम्ही तिला का आणले? तिला काय सांगताय?' त्या महिलेला आम्ही सांगण्याचा प्रयत्न केला की, ही चर्चा फक्त गरोदर महिलांसाठी नसून सर्व महिलांसाठी आहे. परंतु आमचे काहीही न ऐकता ती आपल्या सूनेला ओढत घेऊन गेली. हे असे का घडले असे कारण उपस्थित महिलांना विचारल्यावर त्या म्हणाल्या, 'आमच्या गावांमध्ये अजूनही गरोदरपणात चार-पाच महिने झाल्यावर काही व्हायला लागले तरच महिला दवाखान्यात जातात.' दुसऱ्या तिसऱ्या महिन्यात त्या कुणालाही काही सांगत नाहीत, कारण गर्भाला नजर लागेल, गर्भपात होईल अशी त्यांना भीती वाटते. या प्रसंगावरून असे समजते की जेव्हा आपण लोकांच्या चालीरीती, चुकीच्या समजुती, सवयी बदलायच्या गोष्टी करतो तेव्हा त्याआधी लोकांच्या मानसिक, सामाजिक व सांस्कृतिक जडणघडणीच्या मुळापाशी गेले पाहिजे, त्यामागची कारणे शोधली पाहिजेत आणि नंतरच त्यांच्यामध्ये योग्य तो बदल घडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

स्थलकालपरत्वे जिथे महिला असतील तिथे प्रसंगी शेतामध्ये बसूनही मी त्यांच्याबरोबर गटचर्चा घेत असे. महिलांनी, 'ताई रात्री येऊन सभा घ्या' अशी मागणी केल्यावर काही गावांमध्ये रात्री राहूनही आम्ही निरनिराळ्या विषयांवर चर्चा केली. मुलगा कसा होतो व मुलगी कशी होते? वंध्यत्वामध्ये दोष कोणाचा? ह्या विषयांमध्ये महिलांना प्रामुख्याने रस असे. त्या म्हणत, 'ताई तुम्ही आम्हाला कितीही खरी माहिती दिली, मुलगा किंवा मुलगी होणे पतीवर अवलंबून असते हे सांगितले तरी लोक सुधारणार नाही. एखाद्या महिलेला फक्त मुलीच झाल्या तर हिच्यामध्येच काहीतरी दोष आहे असे घरातील लोक म्हणतात. मूल होत नसेल तर दोघांची तपासणी गरजेची आहे असे तुम्ही म्हणता पण फक्त पत्नीचीच तपासणी होते, पती कधीही स्वतःवर दोष घेत नाही. तो दुसरी बायको घरात आणतो'. अशा प्रतिक्रिया व्यक्त करत. म्हणूनच आम्ही लोकांसाठी आरोग्य विषयांवर पुस्तक लिहीण्याचे ठरविले, तेव्हा प्रत्येक विषयांवर आरोग्य मार्गदर्शकांचे मत जाणून घेतले. कोणती व कशी चित्रे हवीत ! हे विचारले तेव्हा ते म्हणाले की, वंध्यत्व या विषयावर लिहिताना तुम्ही स्त्रीमधील दोष किंवा पुरूषामधील दोष असे न लिहिता, मूल न होण्यामध्ये तपासणीसाठी स्त्रीची व पुरूषाची जबाबदारी, असे लिहा. 'दोष' हा शब्द वापरू नका.

कोणताही प्रकल्प सुरू करण्यापूर्वी, गावांमधील सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी पायाभूत सर्वेक्षण करणे गरजेचे असते. अनोळखी असणाऱ्या व्यक्तीने सर्वेक्षण केले असता बरेच वेळा कुटुंबाची खरी माहिती उदा. आर्थिक स्थिती, शेतीविषयक माहिती, महिलांचे काही आजार किंवा मृत्यूची कारणे इत्यादी मिळू शकत नाही. म्हणून हे गावातील कुटुंबांचे सर्वेक्षण आम्ही दुसऱ्या व्यक्तीला करण्यास न सांगता, गावातील आरोग्य मार्गदर्शकांनाच करण्यास सांगितले. गावातील प्रत्येक घरात प्रकल्पाची तसेच गावासाठी काम करणाऱ्या मार्गदर्शकाचीही ओळख व्हावी हा एक हेतूही त्यामागे होता. मार्गदर्शकांना लिखाणाची जास्त सवय नसल्यामुळे या कामास थोडा वेळ लागला मात्र त्यामागचा उद्देश बऱ्याचअंशी यशस्वी झाला. सर्वेक्षण पत्रकातील माहिती भरतानाही मार्गदर्शकांना बऱ्याच अनुभवांना सामोरे जावे लागले. ही माहिती तुम्ही कशासाठी गोळा करता? तुम्ही आम्हाला औषधे पुरवणार का? मग आजारांची माहिती कशासाठी द्यायची? आमची शेती कमी लिहा. शहरात काम करणारे पुरूष घराकडे किती पैसे पाठवतात, ह्याच्याशी तुम्हाला काय करायचे आहे? अशा एक ना दोन अनेक प्रश्नांना त्यांना तोंड द्यावे लागले. तरीही गावातीलच स्वतः एक ग्रामस्थ असल्यामुळे मार्गदर्शकांनी या माहितीचे महत्त्व पटवून देऊन बऱ्याचअंशी

खरी माहिती मिळवली, तसेच ज्या गावची लोकसंख्या मोठी आहे त्यात इतर मार्गदर्शकांनी स्वतःहून सर्वेक्षणासाठी मदत केली.

पुरूषांची, प्रामुख्याने तरूण मुलांची गटचर्चा संस्थेचे कार्यकर्ते श्री. अभय कुदळे, रात्री गावात राहून करत असत. तरूण मुले व पुरूष गावातील मंदिरांमध्ये जमत आणि एड्स, गुप्तरोग, स्त्री- पुरूष शरीररचना, कुटुंब नियोजन अशा विविध विषयांवर चर्चा करत. तरूण मुलांना इतरही बऱ्याच विषयांवर चर्चा करायची असे, परंतु गावातील मोठ्या पुरूषांच्या समोर ती बोलत नसत. पुरूषांची चर्चा झाल्यावर ते निघून गेल्यानंतर ही मुले जमत व त्यांच्या मनातील शंका व प्रश्न विचारत. एड्सबद्दल माहिती ऐकताना ती गोंधळून जात. लग्न करावे की नाही? लग्नाआधी होणाऱ्या बायकोचे रक्त एड्सचे जंतू आहेत का हे पाहण्यासाठी तपासावे का? अशा अनेक शंका त्यांना ग्रासत असत, काहीजण भीतीने अर्ध्या चर्चेतून उठून जात. अशा तरूण मुलांना विशेषतः गावातून काही दिवस कामासाठी शहरात असणाऱ्या मुलांना योग्य मार्गदर्शनाची, त्यांच्याशी मोकळेपणाने बोलून त्यांच्या मनातील शंका काढून टाकण्याची अत्यंत गरज आहे, हे समजून आले.



(वेल्हे तालुक्याला भेट देण्यासाठी आलेले परदेशी पाहुणे, 'मास' चे कार्यकर्ते व आरोग्य मार्गदर्शक)

अमेरिकेतील फिलाडेल्फिया या शहरातील पेनसिल्व्हीनिया विद्यापीठातून निवडक विद्यार्थी दर वर्षी पुणेविद्यापीठामध्ये भारतीय संस्कृती, आरोग्य व समाज, संगीत नृत्य, ग्रामीण विकास या विषयांचा अभ्यास करण्यासाठी येत असतात. दिनांक २३ जून २००० रोजी त्यांतील काही विद्यार्थ्यांनी वेल्हे येथे भेट दिली.

पंचायत समिती, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रूग्णालय यांची कार्यपध्दती जाणून घेण्यासाठी पंचायत समितीचे सभापती श्री. रघुनाथ कथुरे, उपसभापती सौ. बेबीताई कोडीतकर, आरोग्य अधिकारी डॉ. चावला यांच्याशी चर्चा केली. तुमच्या भागात कोणता शासकीय कार्यक्रम चांगल्या प्रकारे चालतो, असे तुम्हाला वाटते? असं एका अमेरिकन विद्यार्थ्याने विचारले. प्रश्नाला उत्तर देताना सौ. बेबीताई कोडीतकर म्हणाल्या, आता शिक्षणाचा प्रसार चांगला होत आहे. सर्व गावांमध्ये शाळा आहेत. आज आम्हाला तुमच्याशी इंग्रजीतून थेट संवाद साधता येत नाही. परंतु काही वर्षांनी जर तुम्ही परत आलात तर आमची मुले तुमच्याशी थेट इंग्रजीतून बोलतील. या भागातील पाण्याचा प्रश्न व इतर आरोग्यविषयक समस्यांवरही चर्चा झाली. या विद्यार्थांनी पाबे व लाशिरगाव या दोन गावांना भेट देऊन तेथील आरोग्यमार्गदर्शकांशी व ग्रामस्थांशी चर्चा करून कुटुंबातील स्त्रीचे स्थान, स्त्रीच्या आरोग्यविषयक समस्या या विषयांवर विस्तृत माहिती मिळवली. डॉ. चावला यांनी ग्रामीण रूग्णालयात स्त्री डॉक्टर असणे अतिशय महत्त्वाचे आहे अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

आता काही गावातील महिला आरोग्य मार्गदर्शकांना स्वतःच्या कामाबद्दल आत्मविश्वास निर्माण झाला आहे. त्या गावामध्ये देत असलेल्या आरोग्यविषयक सल्ल्याचा उपयोग होतो आहे, हे पाहून त्यांना कामाला हुरूप येत आहे. या बाबत आमच्या काही महिला मार्गदर्शकांचे अनुभव फारच बोलके आहेत. वेल्हे खुर्द या गावच्या पार्वतीताईंनी, बरेच दिवस मूल न होणाऱ्या दोन महिलांना स्त्रीबीज तयार होण्याच्या काळाविषयी समजावून दिले व त्या दोनही महिला आता गरोदर आहेत. एका महिलेला अंगावरून पांढरे जाते या तक्रारीसाठी त्यांना सांगितलेले कडुलिंबाच्या पाल्याचे औषध त्यांनी वापरायला सांगितले व त्या महिलेचा त्रास कमी झाला. त्यांच्या गावातील एका गरोदर महिलेला पहिल्या दोन बाळंतपणाच्यावेळी त्रास झाला होता. रक्त कमी होते. ती महिला दिलेल्या लोहाच्या गोळ्या खात नव्हती. पार्वतीताईंनी तिला लोहाच्या गोळ्यांचे महत्त्व पटवून दिले व तिसऱ्यावेळी गोळ्या खाण्यास सांगितले. त्या गरोदर स्त्रीने ताईंनी सांगितलेले ऐकून गोळ्या घेतल्या व सुखरूप काहीही त्रास न होता बाळंतीण झाली. तिने पार्वतीताईंचे आभार मानले. प्रशिक्षणामध्ये गरोदर स्त्रीच्या हाता तोंडावर सूज येणे हे धोक्याचे लक्षण पार्वतीताईंनी लक्षात ठेवले होते. हे लक्षण प्रत्यक्ष स्वतःची गरोदर भावजयीच्या अंगावर पाहिले व त्यांनी तिला तातडीने रूग्णालयात नेण्यास भाग पाडले.

'तुम्ही यांना वेळेवर दवाखान्यात आणले नसते तर आई व बाळ दोघांनाही जीव गमवावा लागला असता' असे डॉक्टर म्हणाल्यावर आपल्याला मिळालेले हे ज्ञान की मोलाचे आहे हे समजून पार्वतीताईंना आनंद झाला. पाबे येथील निर्मलाताई सुद्धा गावातील महिलांना वेळोवेळी मार्गदर्शन करतात, तेव्हा त्यांना असेच अनुभव येतात. या सर्व अनुभवांमुळे आत्मविश्वास वाढलेल्या पार्वतीताई, निर्मलाताई, उमाताई, तसेच काका वैद्य हे पुरूष मार्गदर्शक फक्त स्वतःच्याच गावात नाही तर प्रकल्पातील इतर गावांमध्ये जाऊन महिलांच्या गटचर्चा घेऊ लागले आहेत. हा स्वतःच्यातील बदल कधीकधी त्यांनाही चकित करून जातो.

प्रजनन व बाल आरोग्य या विषयांवर जरी आमची चर्चा होत असली तरी इतर रोगांवर, त्यांच्या कारणांवर, त्यावर उपलब्ध असणाऱ्या औषधांवर लोकांचे अनेक प्रश्न असत. उदा. कॅन्सर, हिवताप, दाढदुखी, डोकेदुखी, तंबाखूचे दुष्परिणाम, क्षयरोग, कुष्ठरोग, काविळ इत्यादी. हे रोग पसरतात कसे? त्यावर आम्ही गावातल्या गावात जे जडीबुडीचे उपयोग करतो ते बरोबर आहेत का? काविळ जास्त हळद खाल्यामुळे होते का ? एका गावातील कुटुंबातील एका भावाला तोंडाचा कॅन्सर झाल्यामुळे दुसऱ्या भावाने आपल्यालाही तो रोग होईल ह्या भीतीने घराबाहेर काढले. यावरून लोकांना कुठला रोग संसर्गजन्य आहे, कुठला नाही हे न समजल्यामुळे त्याचा रोग्याच्या कौटुंबिक व सामाजिक स्थानावर कसा परिणाम होतो हे दिसून येते आणि वैद्यकीय दृष्टिकोनातून आपण जेव्हा 'संसर्गजन्य रोग' असे म्हणतो तेव्हा ते केसर्व रोग पसरण्याचे माध्यम वेगवेगळे असते. सर्व संसर्गजन्य रोग हवेतून, स्पर्शातून पसरत नाहीत ही माहिती लोकांपर्यंत अजूनही व्यवस्थित पोहोचत नाही याची आपल्या 'माहिती संपर्क शिक्षण खात्यानेही' जरूर दखल घ्यायला हवी.

उन्हाळा वाढू लागला तशी पाणी टंचाई जाणवू लागली. गावातील महिला कपडे धुण्यासाठी, पिण्याचे पाणी भरण्यासाठी २-३ कि.मी. रोज चालत असत. प्रसंगी घरातील तरूण मुली त्यांच्या मदतीला येताना दिसत होत्या. काही ठिकाणी या मुली एका गावातून दुसऱ्या गावातील हातपंपावर पाणी भरण्यासाठी रांग

लावत होत्या. पण त्या दोन-तीन महिन्यात मला कुठेही पुरूष किंवा तरूण मुले पाण्याचे हंडे नेताना दिसली नाहीत. याचा अर्थ असा होतो की फक्त लोहाच्या गोळ्या आणि पुढच्या बीजाचेच काम करते मग स्त्रीची काळजी पुरूषाकडून घेतली जाते का ? हेही पाहिले पाहिजे. कारण स्त्रीचे आरोग्य सुधारण्यासाठी पुरूषाचा सहभागही तितकाच, किंबहुना जास्त महत्त्वाचा ठरतो. वेल्ह्यामध्ये आता प्रत्येक गावात शिक्षण सुविधा आढळतात. फक्त विद्यालयच नाही तर उच्चशिक्षणासाठी महाविद्यालयाची सोय देखील झाली आहे.

पंचायत समिती-उपसभापती, सरपंच, उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य अशा महत्त्वांच्या पदांवर गावातील महिला काम करत आहेत. आणि हळूहळू महाविद्यालयांमधील मुलींची संख्याही वाढत आहे. परंतु गावात एकजुटीचा अभाव, ज्या काही सोयी करायच्या त्या सरकार करेल अशी परावलंबित्वाची भावना, शास्त्रीय माहितीचा अभाव या गोष्टींमुळे हा भाग मागे पडला आहे. ग्रामीण भागातील स्त्रियांना काय कळते असे समजून त्यांना बऱ्याच शास्त्रीय माहितीपासून दूर ठेवले जाते. उदाहरणार्थ, लोहाच्या गोळ्या खाल्ल्या की शक्ती येते असे महिलांना सांगितले जाते; परंतु तेच शरीरातील लोहाचे कार्य व त्याची गरज जर आपण व्यवस्थित समजावून दिली तर ते महिलांना पटते व त्या म्हणतात 'ह्या गोष्टी खरंच डोक्यात ठेवण्यासारख्या आहेत. ह्या आमच्या तरूण मुली व सुनांना सांगा.' याचाच अर्थ असा की गावातील लोकांनी एकत्र येऊन, गावातील तरूण मंडळांना हाताशी धरून, सरकारच्या किंवा बाहेरील कोणाच्याही मदतीवर अवलंबून न राहता, स्वावलंबनाने आपल्या गावाची आरोग्ययंत्रणा उभारली, सांडपाण्याचा निचरा करून स्वच्छता राखली व रोगांच्या प्रतिबंधाची उपाय योजना केली, तसेच सतत विविध शास्त्रीय माहिती मिळवून गावातील लोकांशी चर्चा करून आपल्या राहणीमानात आवश्यक तो बदल घडवून आणले तर वेल्ह्याचाच नाही तर महाराष्ट्रातील इतर ग्रामीण भागांचाही कायापालट होण्यास वेळ लागणार नाही.

आरोग्यविषयक जाणीव जागृती कार्यक्रम, वेल्हे या प्रकल्पात आपापल्या गावांचे प्रतिनिधित्व करणारे आरोग्य मार्गदर्शक आहेत -

१.वेल्हे खुर्द	-	सौ. पार्वती नागेश जाधव
		श्री. शंकर जाधव
२.ब्राह्मणघर	-	सौ. पार्वती नागेश जाधव
		श्री. शंकर नथू जाधव
३.खोडद	-	सौ. संगीता मोहन सणस
४.कोंढावळे (बु.)-		सौ. चंद्रभागा लक्ष्मण मोरे
५.कोंढावळे (खु.)-		सौ. हिराबाई नाना खोपडे
६.हिरपोडी	-	सौ. शशिकला गेनबा राजीवडे
७.पाबे	-	सौ. निर्मला बबन हांडे
		श्री. राम सखाराम रेणूसे
८.दापोडे	-	श्रीमती उमा हेमंत ढवळे
		श्री अनंत कोंडीबा गुरव
९.लाशिरगाव	-	सौ. सुरेखा अर्जुन कातुर्डे
		श्री. श्रीकृष्ण (काका) वैद्य
१०.मालवली	-	सौ. मालन रघुनाथ जाधव
११.खरीव	-	सौ. सविता दशरथ शिंदे
१२.वांजळे	-	सौ. शोभा भीमराव गायकवाड
		श्री. लक्ष्मण निवृत्ती पवार
१३.कोंढावली	-	सौ. कांता तानाजी करंजकर
१४.खांबवडी	-	श्रीमती द्रौपदाबाई ज्ञानोबा धायगावे

००

वेल्हे प्रकल्पातील आरोग्य मार्गदर्शकांचे अनुभव कथन

'आमचे कार्य घरोघरी पोचलं आहे'

छायाचित्रात प्रा. रा. के. मुटाटकर, डॉ. कल्पना मुटाटकर व प्रकल्पातील आरोग्य मार्गदर्शक दिसत आहेत

१९९९ च्या नोव्हेंबर महिन्यात एके दिवशी संध्याकाळी माझ्या घरी काही अपरिचित लोकं आली. मी तेव्हा घरी नव्हतो; परंतु आलो तेव्हा त्यांची भेट झाली. नमस्कार वगैरे झाल्यावर मी बोलण्या अगोदरच त्यांनी आपली ओळख करून दिली व येण्यामागचे कारणही सांगितले. सर्व माहिती व्यवस्थित मिळाल्यानंतर मी गावात फिरून ग्रामस्थांना देवळात जमण्यास सांगितले. लोक रात्री भैरवनाथ मंदिरात जमल्यानंतर संस्थेच्याच लोकांनी आपली ओळख व संस्थेच्या कार्याची माहिती करून दिली. २९ ऑक्टोबर रोजी वेल्हे पंचायत समितीच्या पदाधिकारी, व इतर कार्यकर्त्यांना संस्था कोणत्या गावांमध्ये काम करणार आहे हे समजले होते. आता प्रत्येक गावात मिटींगा घेऊन ग्रामस्थांना समजणे गरजेचे होते म्हणून आमच्या लाशीरगावात आज ही मिटींग होत आहे, हे संस्थेच्या कार्यकर्त्यांच्या बोलण्यावरून लक्षात आले. संस्थेच्या कामाकरिता गावातून एक स्त्री व एक पुरूष कार्यकर्त्यांची गरज आहे हे गावकऱ्यांना सांगितल्यावर गावकऱ्यांनी एका महिलेचे व माझे नाव सुचविले. माझा आरोग्याच्या कामाशी २० वर्षे संबंध असल्यामुळेच कदाचित ग्रामस्थांनी माझे नाव सुचविले असावे. संस्थेने आम्हाला 'आरोग्य मार्गदर्शक' हे नाव दिले.

आमची निवड झाल्यानंतर आम्हाला ११,१२,१३ डिसेंबर ९९ या तीन दिवसांच्या ट्रेनिंगसाठी, वेल्हे येथे बोलावण्यात आले. या तीन दिवसात आम्हाला केवळ 'प्रजनन आणि बाल आरोग्य' एवढीच नाही, तर किशोर अवस्थेतील मुला-मुलींचे आरोग्य, गरोदरपण, आयुर्वेदिक औषधे, बाळंतपण, गर्भपात, वंध्यत्व, लसीकरण, शरीर रचना, तरूणांशी कसे बोलावे, एड्स, शारीरिक स्वच्छता, व्यसने, लग्नाचे वय, इत्यादी अनेक विषयांवर भरपूर माहिती मिळाली. मुटाटकर मॅडम, शिल्पाताई, डॉ. अनिता पित्रे, वाडकर सिस्टर, डॉ. जोशी, सोनी सर, सावंत यांनी या विषयांवर आम्हाला मार्गदर्शन केले. या ट्रेनिंगचे तीन दिवस कसे संपले ते कळले देखील नाही. नंतर आमच्या गावोगावी रात्री मिटींगा घेण्याचे ठरवले व त्याप्रमाणे मिटींगा चालू केल्या.

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे कार्य चालू होऊन १ वर्ष होत आले. आम्ही मार्गदर्शकांनी आरोग्याचे संदेश गावोगाव पोहचवले आहेत. या कामात आम्हाला शिल्पाताई व अभयदादा यांचे चांगले मार्गदर्शन लाभत आहे. सुरूवातीला आम्ही ग्रामस्थांमध्ये राहात असल्यामुळे कोणत्याही विषयावर चर्चा करायला लाजत होतो, पण आता आमची भीड चेपली गेलेली आहे. त्यामुळे गरोदर महिला असो किंवा बाळंतपणाची वेळ असो आम्ही आमचे

मार्गदर्शनाचे कार्य व्यवस्थित सांभाळीत आहोत. ग्रामस्थांकडून काही प्रश्न येतात त्यांची उत्तरे अभयदादा व ताईंच्या मदतीने देत असतो.

सध्या आम्ही आमच्याच नाही, तर परगावी देखील संस्थेच्या ठरलेल्या १४ गावांमधून आरोग्याबद्दल मिटींगा घेत असतो. सुरूवातीला गावातले ग्रामस्थ काही माहिती देण्यास संकोच करायचे, पण आता अजिबात संकोच न बाळगता स्त्रिया व पुरूष प्रश्न विचारतात, माहिती देतात. कुटुंबाचा सर्व्हे चालू असल्यामुळे प्रत्येक गावातील घरोघरी आमचे कार्य पोचले आहे. आम्ही उपचारापेक्षा आजारपण होऊच नये यावर जास्त भर देत आहोत.

श्रीकृष्ण रघुनाथ वैद्य
लाशिरगाव

'आमचा प्रकल्प चुलीपर्यंत पोचला आहे'

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद हा शब्द तर कधी ऐकला नव्हता नि कुठं वाचलाही नव्हता, पण नोव्हेंबर महिन्यात एके दिवशी घरी आले तर मुली मला म्हणाल्या, 'तुला एक पत्र आलंय'. पत्रात लिहिलं होतं, 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद ह्या संस्थेत काम करायला आम्हाला तुमच्या गावातून तुमचे नाव सुचविण्यात आले आहे'. नंतर गावात चौकशी केली असता सरपंच व अन्य तीन लोकांनी सांगितले की, 'आम्ही तुमचे नाव सुचविले'. त्यांना मी विचारले की, 'माझे नाव तुम्ही कसे सांगितले'. ते म्हणाले, 'तुम्हाला बाहेरील जगातले अनुभव आहेत. थोडंफार शिक्षण आहे व तुम्ही ते काम करू शकाल'. 'तुमची सर्वांची इच्छा आहे तर ते काम करायला मी तयार आहे'. असं मी गावकऱ्यांना सांगितले.

११ ते १३-१२-९९ हे तीन दिवस प्रशिक्षणाकरता वेल्हे येथे आम्हाला बोलावण्यात आले. पहिल्या तीन दिवसांच्या प्रशिक्षणात आम्हाला या सर्व मंडळींकडून ज्ञानदान झाले. त्यामुळे आमच्या थोड्याशा ज्ञानात खूप मोलाची भर पडली. नंतर आम्ही आमच्या गावात मिटींग घ्यावयास सुखात केली. गावात पहिलीच मिटींग घ्यावयाची तर थोडा प्रश्नच पडला. मग मनाशी विचार केला मिटींग कोणाची घ्यावयाची. नंतर लक्षात आलं, आपल्या वस्तीत ८ ते ९ महिला गरोदर आहेत. त्यांच्याशीच चर्चा करायची, म्हणून शिल्पाताईंना सांगितले 'तुम्ही या'. ताई आल्यानंतर ५ ते ६ महिलांना सांगितले, त्या चर्चेला आल्या. त्यांचेशी गरोदरपणात घ्यावयाची काळजी, आहार, तपासणी, वजन, उंची, रक्तदाब, नाव नोंदणी, धनुर्वात लस, लोहाच्या गोळ्या, लघवी, विश्रांती या विषयांवर चर्चा केली. या सगळ्याचे फायदे समजावून सांगितले व असे केले नाही तर काय हा तोटे होतात हे पण समजावून सांगितले.

आमची ही चर्चा चालू असताना एक महिलेची सासू आली व सुनेला म्हणाली, 'तुला कुणी बोलव तू इथं कशाला आलीस' व ती खूप बडबड करायला लागली. मग तिला मी समजावून सांगितले, 'तिला आम्ही बोलवलं म्हणून ती आली.' तर ती म्हणाली, अजून काहीच नाही आणि हिनी सगळ्या गावात केलं. त्याचं म्हणणं होतं की सून गरोदर आहे हे कुणाला माहीत झालं नाही पाहिजे. मग दुसऱ्या दिवशी मी त्यांच्या घरी गेले. घरी सासू नव्हती तर मुलीचा नवरा होता. त्याला सगळा प्रकार मी सांगीतला. तो म्हणाला 'काकू आईला काय कळतंय तुला तिला काय सांगायचं तू सांगत जा, व प्रत्येक मिटींगला तिला बोलवत जा. 'अशी आमची पहिल्या मिटींगची सुरवात झाली. दुसरी मिटींग घेतली त्या वेळेला १५ ते १८ वयोगटातील ११ मुली होत्या. शिल्पाताई पण आल्या होत्या. मुलींना बोलवल्यानंतर त्या आल्या, पण विषय कुठला घ्यायचा विचारल्यानंतर काहीच बोलायला तयार होईनात. मग शिल्पाताईंनी त्यांना विचारलं. 'तुम्हाला

शाळेत काही शिकवलं जातं का किंवा तुमची गावात एखादी नर्स वगैरे येऊन अशी काही माहिती देते का - मासिक पाळी म्हणजे काय, मासिक पाळी कशी येते? तर काही मुली 'हो' म्हणाल्या' पण ताईंनी विचारले 'फक्त माहिती देतात की चित्रं वगैरे दाखवतात?' त्या म्हणाल्या, 'चित्र वगैरे नाही पण माहिती सांगतात. मग त्यांना शिल्पाताईनी मासिक पाळी हे पुस्तक दाखवून स्त्रीची शरीर रचना व मासिक पाळी कधी येते व कशी येते या विषयावर चर्चा केली. मग 'पाळीत काही अमंगळ नाही तुम्ही कोणतेही काम करू शकता शाळा कॉलेजात जाऊ शकता घरात सगळं काम करू शकता.' हे सगळं समजावून सांगितल्यानंतर ताईना यांनी प्रश्न विचारायला सांगितले.

त्या मुलींनी असे काही प्रश्न विचारले की, मुलींना आपल्या कडून खूप काही महिती हवी असते पण त्या सुरवातीला काही बोलत नाहीत हे समजले. हळूहळू त्या सगळं काही माहीत करून घेतात. मग त्यांच्यातल्या एका मुलींनी प्रश्न विचारला 'जुळी मुली कशी होतात? व पोटात मूल जिवंत कसे राहते?' ताईंनी त्यांच्या प्रश्नांची उत्तरे अगदी त्यांचं समाधान होईल असे सांगितले. सुरवातीला लाजणाऱ्या मुली ताईना म्हणाल्या, 'आता तुम्ही परत कधी येणार." सुरवातीला मला पण वाटलं की हे विषय आपण गावात कसे बोलू. पण ह्या दोन्ही मिटींगमुळे वाटू लागलं चला, सगळे जरी लोक आले नाही तर थोडेफार येतील, त्यांच्याबरोबर आपण चर्चा करायची. अशीच कुठं चार तर कुठं दोन लोक भेटतील त्यांना आपण काय काम करत आहे हे सांगून जिथ कुणी भेटेल त्यांच्याशी चर्चा करते.

आमच्या प्रकल्पाच्या सुरूवातीच्या मिटींगला आम्ही जायचो पण तिथं काय बोलायचे हे काही कळत नव्हतं. सर, मॅडम, ताई सगळे बोलायचे नि आम्ही ऐकायचं काम करायचो. पण बोलायचं काम मात्र कुणीही करायचं नाही. कारण हे विषय म्हणजे पुरूष व स्त्रिया एकत्र बसून आपण कुठेही बोललो नव्हतो किंवा ऐकलेही नव्हते, पण ऐकून एवढी सवय लागली की आता बोलायला पाहिजेलच. मग बोलायला सुरूवात केली. चर्चा करायला सुरूवात केली. गावातल्या लोकांनी विचारलेले प्रश्न तिथं सांगायला सुरूवात केली. आता आम्ही पण चांगलं बोलू लागलो. मग आम्हाला सरांनी दुसऱ्या गावाला मिटींग घ्यायला सांगितल्या. आता आम्ही दुसऱ्या गावात पण मिटींग घेतो. नंतर आमच्या प्रकल्पातून आम्हाला कुटुंब सर्वेषण फार्म भरायला दिले.

गावातील प्रत्येक घरातला एक असे सगळ्या गावातून फॉर्म भरायला सुरूवात केली. फॉर्म भरत असताना लोकांनी सुरूवातीला खरी माहिती देत नसत. परंतु त्यांना सगळी माहिती समजावून सांगितल्यावर ते लोक आम्हाला घरातील माहिती देऊ लागले. माहिती देताना कोण म्हणणार तुम्ही आम्हाला काय गोळ्या देणार आहे का आम्ही आता म्हातारे झालो. आम्हाला सरकार काय पैसे देणार आहे का? आमचे हात पाय दुखतात, आम्हाला काम होत नाही, त्याच्या करता तुम्ही आम्हाला काय मदत करणार. मग आम्ही त्यांना सांगितलं आमच्या कामाची आता सुरवात आहे. नंतर तुमची सगळी माहिती गोळा करून आम्ही आमच्या संस्थेकडे देणार आहे. मग ते लोक काहीतरी विचार करतील,' असं त्यांना समजावून सांगून आम्ही फॉर्म भरले.

नंतर मग सरांचे एक दिवशी पत्र आले की आपल्या वेल्हे भागात काही अमेरिकन विद्यार्थी येणार आहेत. त्यांना वेल्हे येथील पंचायत समिती, बाजारपेठ, सरकारी दवाखाना हे पाहायचाय व तुमच्या संस्थेत काम करणारी दोन गावे पहायची आहेत. मग सरांनी पाबे व लाशिरगाव ही दोन गावे निवडली. मग गावातील लोकांना सांगितले,

'आपल्याकडे परदेशी पाहुणे येणार आहेत तर गावातील लोकांनी पण चांगले सहकार्य केले' मला म्हणाले 'हे लोक आपल्याकडे कसे काय आले?' तर त्यांना सांगितले, 'हे अमेरिकन लोक आपल्या ग्रामीण भागातल्या आरोग्याची पाहणी करण्याकरता आले होते. काही लोक भारतीय पण आहेत व काही अमेरिकन पण आहेत.' मग लोकांना पण विश्वास वाटला की हे लोक आरोग्याचं काही तरी काम करतायत. कारण ह्यापूर्वी बऱ्याच लोकांनी बालवाडी, प्रौढशिक्षण असे कार्यक्रम राबविले पण अशी कोण लोक आपल्या गावात आली नव्हती व अशी आपल्याकडून कोणी माहिती पण घेतली नव्हती.

आता एक वर्षात आम्ही पण बरेच काही शिकलो आहोत. दुसऱ्यांना शिकवत आहोत, पण आम्हाला अजून खूप शिकायचं आहे. मग आमच्या संस्थेत दुसऱ्या संस्थेचे लोक आले. त्यांनी त्यांच्या कामाचा अनुभव व आम्ही आमच्या कामाचा अनुभव त्यांना सांगितला. अशी आमच्या कामाची रूपरेषा आहे. आता आम्ही पण थोडं धीटपणे काम करतो व अजून हे काम खूप चांगल्या प्रकारे आम्हाला करता यावे अस मनातून वाटतं व तसा आम्ही प्रयत्न करू व आमचे काम खूप मनापासुन करू. सरकारी माणसे लोकांच्या चुली पर्यंत जात नाहीत पण आमचा प्रकल्प प्रत्येक घरातील चुलीपर्यंत जाऊन पोहोचला आहे. हा लेख म्हणजे आयुष्यात आपण आपल्याबद्दल कधी एक शब्द न लिहिताही एवढा लेख कसा काय लिहायचा पण कसा तरी वेडावाकडा लिहून दिला आहे. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद संस्था वेल्ह्यातून आमच्या गावातून खूप कार्यरत आहे व अजून त्यांचे कार्य खूप वाढावे व आम्हाला पण काम करण्याची संधी मिळावी हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

निर्मला बबनराव हांडे
पाबे

'संस्थेमुळे समाजात काम करायची संधी मिळाली'

२८ मार्च २००० रोजी माझ्या घरी अभय कुदळेसर व काका वैद्य आले. ओळख वगैरे झाल्यावर त्यांनी मला संस्थेत काम करण्याविषयी विचारले. ते ऐकून मला भरपूर आनंद झाला. कारण, समाजात काम करायला मिळावं असं मला नेहमीच वाटायचं. त्यामुळे मला आनंद होणं साहजिक होतं. घरच्या लोकांनी विरोध न करता मला काम करण्यास संमती दिली. गावातल्या लोकांनीच माझी निवड केली होती.

वेल्ह्याचे प्रशिक्षण घेतल्यानंतर जेव्हा गावात काम करायला सुरुवात केली तेव्हा 'आपलं काही चुकतंय का' अशी शंका वाटायची. पण थोड्याच दिवसात मी बोलू लागले. माझे विचार गावातील महिलांसमोर मांडू लागले. त्यांचाही मला चांगला प्रतिसाद मिळू लागला. त्यामुळे माझ्यात एक प्रकारचा उत्साह निर्माण झाला.

एक दिवस मी कामानिमित्त एका आजारी आजीबाईला पाहण्यासाठी गेले होते. तिथे काही महिला जमल्या होत्या. त्यांच्यात एका व्यक्तीविषयी चर्चा चाललेली होती. एका माणसाला पाच मुली आहेत आणि सहावी देखील मुलगीच झाली तर मात्र त्याने दुसरं लग्न करावं, तरच त्याला मुलगा होईल, असं त्याच्या नातेवाईकांचं म्हणणं होतं. मी ते ऐकलं आणि त्या आजीबाईंना व तिथल्या महिलांना मुलगी होण्यामध्ये केवळ स्त्रीच कारणीभूत नसते तर पुरूष्याचाही त्यात तितकाच सहभाग असतो हे समजावून सांगितले. हाच सल्ला मी त्या व्यक्तिच्या घरी जाऊन दिला. त्यांना देखील माझे म्हणणे पटले.

अशा वेगवेगळ्या विषयांवर मी लोकांशी चर्चा करायची. मग ती चर्चा मुलींच्या आरोग्यावर असेल, ओटी-पोटाच्या दुखण्याविषयी, वंध्यत्वा विषयी, लग्नाच्या वयाविषयी, मासिकपाळी, लैंगिक संबंध अशा सर्व विषयांवर

मी चर्चा करून लोकांना माहिती देत असते.

एका गावात मी व माझ्या कांता नावाच्या सहकारिणीला घेऊन गेले असताना तिथल्या महिलांनी मला विचारलं की, 'तुम्ही काम करता तो तुमचा फायदा आहे, कारण तुम्हाला पैसे मिळतात. आम्हाला त्याचा काय उपयोग.' त्यावर मी थोडीशी चिडले; परंतु लगेचच विचार करून शांतपणे त्यांना पटवून सांगितले की, 'ताई असं का बोलता, तुम्हाला याचा काहीच फायदा नाही का? तुमच्या आरोग्याविषयी, आजारांविषयी माहिती मिळते. प्रथमोपचाराने बरं वाटलं तर तुमचाच त्यात फायदा आहे, असं नाही का वाटत.' त्या महिलांना माझं म्हणणं पटलं. त्या आमची मिटींग संपल्यावर तुम्ही परत कधी येणार असं विचारू लागल्या.

सुरेखा कातुर्डे
लाशिरगाव

'आरोग्यविषयक माहितीमुळे मुलांच्या वागण्या-बोलण्यात फरक पडलाय'

एप्रिल २००० पासून मी माझ्या गावात संस्थेच्या कामाला सुरूवात केली. माझ्या कामाविषयी माझ्या घरातल्या पत्नी व मुलांचा कोणाचाही विरोध नाही.

माझ्या गावात रात्रीच्या वेळी मी मुलांची मिटींग घेतो तेव्हा मुले तऱ्हेतऱ्हेचे प्रश्न मला विचारतात. त्यात मुतखडा, टी.बी. रोग, एड्स व इतर काही विषयांवर प्रश्न विचारले जातात. सुरूवातीला संस्थेच्या ताई व साहेब यांच्या मदतीने मुलांना सर्व माहिती दिली. मी गावात कोणाशीही जास्त बोलत नव्हतो, पण जेव्हा या संस्थेत कामाला राहिलो तेव्हा आता मला गावात बोलायला काही वाटत नाही. मुलांनी काहीही प्रश्न विचारले तरी माझ्याकडच्या पुस्तकांच्या मदतीने मी त्यांना पाहिजे ती माहिती देतो. सुरूवातीला १० वर्षांच्या पुढील मुलांशी बोलताना ती मुले मला हसायची व काहीही बोलायची. पण जेव्हा शिल्पाताई व कुदळे साहेब मुलांना सर्व सांगायला लागले तेव्हा त्यांना माझंही खरं वाटायला लागले. या संस्थेत आल्यापासून माझ्या वागण्यात फरक पडलेला आहे. आमच्या गावातील मुलांमधील वागण्या बोलण्यात फरक पडलेला आहे. एड्स व गुप्तरोग याविषयी ताई व साहेबांनी खूप चांगल्या प्रकारे माहिती तयार केलेली आहे. ही माहिती आम्ही शाळेतल्या व गावातल्या मुलांना देतो. आमच्या तालुक्यातील चौदा गावांमध्ये संस्थेच्या आरोग्यविषयक प्रकल्पाची माहिती झालेली आहे. संस्थेने दिलेल्या माहितीमुळे लोकांमध्ये व मुला मुलींमध्ये जागृती दिसू लागली आहे.

अनंता कोंडीबा गुरव
दापोडे

'संस्थेच्या कामाविषयीचे लोकांचे गैरसमज दूर करतो'

या संस्थेत आरोग्य मार्गदर्शक म्हणून काम करीत असताना संस्थेची उद्दिष्टे व ध्येय धोरणे यांचा विचार केल्यावर मला लक्षात आले की, मानव आणि त्याचे आरोग्य ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. संस्थेच्या प्रजनन व बाल आरोग्य प्रकल्पांतर्गत कुटुंबाचे सर्वेक्षण करताना आम्हा प्रत्येक मार्गदर्शकांस विविध प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. उदा.-कुटुंबातील व्यक्तीची विचारपूस करताना लोक विचारायचे की, याचा आम्हाला काय उपयोग आहे? तसेच कुटुंबाची आर्थिक परिस्थितीची माहिती विचारले असता प्रत्येक जण 'आम्हाला काही आर्थिक मदत देणार आहे का?' असे विचारी. याप्रमाणे इतरही अनेक प्रश्न लोक विचारीत. आम्ही लोकांना या

प्रकल्पाविषयी व्यवस्थित माहिती देऊन त्यांचे काही गैरसमज दूर करण्याचे प्रयत्न करतो.

रामचंद्र सखाराम रेणुसे
पाबे

'ह्या संस्थेत महिलांबरोबर पुरूषांचा सुध्दा सहभाग आहे.'

माझ्या गावातून मला असे काम करण्याची संधी दैवयोगानेच मिळाली. प्रशिक्षणाच्या काळात आम्हाला वेगवेगळ्या विषयांवर माहिती सांगण्यासाठी काही पाहुणे मंडळी सुध्दा आली होती. प्रशिक्षण चालू असताना मुटाटकर मॅडमनी आम्हाला गर्भाशयाच्या पिशवीचं मॉडेल दाखवलं. ते पाहताना आम्हाला खूप लाज वाटली. मॅडमनी प्रश्न विचारले तेव्हा आम्हाला उत्तरं द्यायला पण लाज वाटायची. असे वाटायचे की मॅडम पुरूषांच्या देखत काहीतरीच सांगतात. पहिल्यांदा प्रशिक्षणाला पण जावंसं वाटायचं नाही. कारण तिकडून आल्यावर माणसं विचारायची की, 'तुम्हाला आज मॅडमनी काय शिकवलं?' त्यांना सांगायला पण आम्हाला लाज वाटायची. एखाद्या व्यक्तीला सांगितलं तर त्यांना त्याचा विश्वास बसत नसायचा. ते म्हणायचे की, 'या वयात हे काही शिकायचं असतं का?' घरचे विरोध करायचे तरी पण मी त्याकडे दुर्लक्ष केले व तरी प्रशिक्षणाला जायचे सोडले नाही.

सहा महिने झाल्यावर मला मॅडमनी गावात महिलांची मिटींग घ्यायला सांगितली. प्रथम मला खूप त्रास सहन करावा लागला. बायका विचारायच्या 'आम्हाला गोळ्या - औषधं देणार आहात का, तर आम्ही येतो नाहीतर आमचा काय फायदा. तुम्ही आपल्या येता तुम्हाला कामं नाहीत म्हणून पगार घेता आणि आम्हाला उगाच तरास.' मी त्यांना समजावून सांगायचे. दोन-तीन मिटींगींना चार-पाच महिला गोळा झाल्या. नंतर शिल्पाताईंनी चित्रमय पुस्तकं, कॅलेंडर दिले होते. त्यातली माहिती त्या चार-पाच महिलांना पटल्यावर सर्व गावात पसरली. मग आम्हाला चांगला प्रतिसाद मिळायला लागला. महिलांना गोडी वाटू लागली. त्यांच्यात आत्मविश्वास वाढला की, खरंच आपल्या अडचणी पुरूष लोक, सासू सासरे विचारात घेत नाही, तर आपणच शिकून, ही माहिती ऐकून हुशार व्हायचे. आपले आजार आपण स्वतःहून डॉक्टरांना सांगायचे. नंतर ताई, सर येऊन आम्हाला मदत करत असत.

मुख्य म्हणजे बाकीच्या संस्था आहेत, त्यात पुरूषांचा सहभाग नाही व दुसऱ्या संस्थांमधील महिलांना संस्थेच्या लोकांकडून चांगला प्रतिसादही मिळत नाही. आमच्या ताई, सर, कुदळे सर, महिन्यातून ३-४ वेळा प्रत्येक गावात मिटींग घेतात. आमच्या अडचणी समजावून घेतात व आम्हाला न येणारी प्रश्नांची उत्तरे समजावून देतात. त्यामुळे मला काहीच अवघड वाटत नाही. आता मी एकटी गावात गटचर्चा करते. गावातल्या बाया, मुली मला स्वतःहून विचारतात की, 'आम्हाला ह्या आजारावर माहिती हवी आहे.' माझ्याकडं काही पुस्तकं, कॅलेंडर आहे, त्याचा उपयोग मी माहिती देताना करते.

काही महिला आजारावर औषधं मागतात. सरांनी व ताईंनी बरीच घरगुती झाडपाल्याची औषधं सांगितली आहेत. मी घरगुती उपचार सांगितल्यावर काही तरूण मुलं, मुली, बाया म्हणायच्या की, 'सर्वांनीच घरची औषधं वापरली तर लोक झाडाचा सोन्याप्रमाणे उपयोग करतील, कशाला चुलीत जाळतील?' म्हाताऱ्या लोकांनाही हे पटतं. ते म्हणतात 'पोरी तुझंच म्हणणं खरं हाये. आपल्याच जवळ डाक्टर हाये. परत्येक रोगावर औषाद मिळतं, पण त्यो आटापिट्टा कोण करतो?'

माझ्या माहितीनुसार गावात खूपच फरक पडलाय.

मी काही गोष्टींचा अनुभव घेतला नि त्यांना पण दाखवून दिला. काही अनुभव —

१. एक बाई, तिला अगोदरची दोन मुले झाली, त्यावेळी ती ६ महिन्यांपासून दवाखान्यात पडून असायची, पायाखाली विटा घेऊन. ती गोळ्या खायची नाही. तिला कसलीच माहिती नव्हती. ज्यावेळी मी तिला गरोदरपणात कोणती काळजी घ्यावी, कोणता आहार घ्यावा हे सर्व सांगितले तेव्हा तिने मी सांगितलेल्या नियमांचे पालन केले. पोट दुखायला लागल्यावर ती दवाखान्यात गेली व लगेच मोकळी झाली. तिला मुलगा झाला. तिलाही खूप बरे वाटले. तिचा खर्च वाचल्यामुळे तिने माझे आभार मानले.

२. एका मुलाला खूप जुलाब, उलट्या व्हायला लागल्या. पाऊस पडत होता. रविवार असल्यामुळे सरकारी दवाखाना बंद. जवळ पैसे नव्हते. मूल खूप गहाळ झाले होते. तोंडाला कोरड पडली होती. ते सारखे पाणी मागत होते. पण कोणी त्याला पाणी देत नव्हते. कारण जुलाब, उलट्या होत असताना पाणी दिले तर वात होतो हा समज. हा सर्व प्रकार मी पाहिला. त्याच्या आईला मीठ साखरेचे पाणी द्यायला सांगितले. पेज, सरबत करून दे म्हटलं, तर कोणीच ऐकेना ! 'हिला वेड लागलंय' असं त्यांना वाटले. पण मी मनाचा ठाम निश्चय केला. त्याला अगोदर उकळून गार केलेले पाणी पाजले. नंतर पेज करून दिली. अर्ध्या तासांनी डाळीचे पाणी पाजले. पुन्हा अर्ध्या तासांनी लिंबाचा रस पाजला. काही तासांतच त्याच्या चेहऱ्यावर तरारी दिसू लागली. थोड्याच वेळात त्याला झोपही लागली. त्या मुलाच्या घरच्यांना त्यांची चूक कळली व त्यांनी तशी कबुली दिली.

३. माझ्या वहिनीची पहिलीच खेप. नववा महिना सुरू झालेला. एक दिवस तिच्या पायावर सूज आली म्हणून तिने मला विचारले. मी तिला सांगितले की पायावर सूज आली तर चालेल, परंतु तोंडावर, अंगावर आली तर मात्र ते धोक्याचं लक्षण असू शकते. आणि खरंच तिला तसं झालं. मी लगेच तिला पुण्याला न्यायला सांगितले. डॉक्टर म्हणाले, 'वेळीच आणलं म्हणून ठीक, नाहीतर बाळ व तिची जगण्याची गॅरंटी नव्हती.'

असे बरेच अनुभव आहेत. एड्सबद्दल, अंगावरून पांढरे जाणे, अर्धांग वायू इत्यादी.

आमच्या चार-पाच गावात आता या कामाची खूपच आवड वाटायला लागली आहे. फॉर्म भरण्याच्या निमित्ताने प्रत्येक घरात जाता आले. बायका, मुलींशी मनमोकळेपणाने बोलता आले. बालविवाह प्रथा, अंधश्रध्दा अशा काही प्रश्नांची जाणीव झाली.

दोन-तीन वर्षात महाराष्ट्र मानव विज्ञान संस्थेचा हा प्रकल्प सर्व प्रकल्पांमध्ये झळकणार आहे आणि त्याकरता आम्ही सर्व आरोग्यमार्गदर्शक एकमताने काम करू व लोकांना (स्त्रियांना) अंधारातून उजेडात आणू. विज्ञानाची कास धरू, अज्ञानाचा नाश करू !

पार्वती नागेश जाधव
वेल्हे खुर्द (दिघेआळी)

आगामी विशेष अंक

१. **पाण्याचा प्रश्न**

२. **भटके विमुक्तांचे प्रश्न**

वरील विषयांवरील साहित्य इच्छुकांनी शक्य तितक्या लवकर पाठवावे

- संपादक

हाकारा अंक-सूची

१) जानेवारी - मार्च १९८० : जबरन जोत जंगल जमीन
२) एप्रिल - जून १९८० : आदिवासी व शिक्षण
३) जुलै - सप्टेंबर १९८० : आदिवासी व वनसंवर्धन
४) ऑक्टोबर - डिसेंबर १९८० : आदिवासी साहित्य व कला
५) जानेवारी-मार्च १९८१ : दलितांना सवलती व राखीव जागा
६) एप्रिल - जून १९८१ : आदिवासी व आरोग्य
७) जुलै - सप्टेंबर १९८१ : वनशेती व संवर्धन
८) ऑक्टोबर - डिसेंबर १९८१ : रोजगार हमी योजना
९) जानेवारी - मार्च १९८२ : उत्तराखंड अभ्यास मोहीम
१०) एप्रिल - जून १९८२ : धरणे व विकास
११ - १२) जुलै - डिसेंबर १९८२ : जंगल व्यवस्थापन
१३) जानेवारी - मार्च १९८३ : आदिवासी व दारू
१४) एप्रिल - जून १९८३ : आदिवासींच्या सामाजिक/राजकीय चळवळी
१५) जुलै - सप्टेंबर १९८३ : प्रा. सरदार गौरव अंक/आदिवासी साहित्य
१६) ऑक्टोबर - डिसेंबर १९८३ : आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न
१७ - १८) जानेवारी - जून १९८४ : आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य
१९) जुलै - सप्टेंबर १९८४ : आदिवासी स्त्री
२०) ऑक्टोबर - डिसेंबर १९८४ : आदिवासी आरोग्य व शिक्षण
२१) जानेवारी - मार्च १९८५ : आदिवासी संघटन
२२) एप्रिल - जून १९८५ : जमीन हस्तांतर
२३) जुलै - सप्टेंबर १९८५ : आदिवासी महिला
२४) ऑक्टोबर - डिसेंबर १९८५ : आदिवासी व सरकार
२५) जानेवारी - मार्च १९८६ : जंगल व धरण
२६) एप्रिल - जून १९८६ : आदिवासी कला
२७) जुलै - सप्टेंबर १९८६ : आदिवासी व वेठबिगारी
२८) ऑक्टोबर - डिसेंबर १९८६ : आदिवासीविषयक ग्रंथ मानवशास्त्र परिचय
२९) जानेवारी - मार्च १९८७ : भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न
३०) एप्रिल - जून १९८७ : आदिवासी आणि सांस्कृतिक बदल
३१ - ३२) जुलै - डिसेंबर १९८७ : राष्ट्रीय वननीतीचा प्रश्न
३३) जानेवारी - मार्च १९८८ : सवलती अपहरणाची समस्या
३४) एप्रिल - जून १९८८ : आदिवासी साहित्य
३५ - ३६) जुलै - डिसेंबर १९८८ : आदिवासी समाज व संस्कृती
३७ - ३८) जानेवारी - जून १९८९ : डॉ. बेरीअर एलबीन विशेषांक
३९ - ४०) जुलै - डिसेंबर १९८९ - व्यवसाय मार्गदर्शन
४१ - ४२) जानेवारी - जून १९९० : महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती
४३) जुलै - सप्टेंबर १९९० : जागतिक आदिवासी
४४) ऑक्टोबर - डिसेंबर १९९० : गं. बा. सरदार स्मृति विशेषांक
४५ - ४६) जानेवारी - जून १९९१ : आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक
४७) जुलै - सप्टेंबर १९९१ : आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समस्या
४८) ऑक्टोबर - डिसेंबर १९९१ : आदिवासी जीवन व संस्कृती
४९ - ५०) जानेवारी - जून १९९२ : सर्वसाधारण आदिवासी
५१ - ५२) जुलै - डिसेंबर १९९२ : अनुताई वाघ विशेषांक
५३ - ५४) जानेवारी - जून १९९३ : आदिवासी धर्म, सण व उत्सव
५५ - ५६) जुलै - डिसेंबर १९९३ : धरण-विस्थापन व पुनर्वसन
५७) जानेवारी - मार्च १९९४ : सर्वसाधारण आदिवासी
५८) एप्रिल जून - १९९४ : आदिवासी एकता परिषद
५९) जुलै - सप्टेंबर १९९४ : आदिवासी विकासाची सैध्दान्तिक भूमिका
६०) ऑक्टोबर - डिसेंबर १९९४ : आदिवासी जमाती
६१ - ६२) जानेवारी - जून १९९५ : राणीपूर अभ्यास विशेषांक
६३) जुलै - सप्टेंबर १९९५ : कुपोषण विशेषांक
६४) ऑक्टोबर - डिसेंबर १९९५ : पर्यावरण विशेषांक
६५) जानेवारी - मार्च १९९६ : आदिवासी जमाती
६६) एप्रिल - जून १९९६ : महाराष्ट्र, ओरिसा अभ्यास दौरा
६७) जुलै - सप्टेंबर १९९६ : आदिवासी जमाती
६८) ऑक्टोबर - डिसेंबर १९९६ : आदिवासी शिक्षण
६९ - ७०) जानेवारी - जून १९९७ : वारली लोकगीते व बोलीभाषा
७१) जुलै - सप्टेंबर १९९७ : पंचायत राज विशेषांक
७२) ऑक्टोबर - डिसेंबर १९९७ : साहित्य संमेलन विशेषांक
७३) जानेवारी - मार्च १९९८ : वृक्ष लागवड व संवर्धन विशेषांक
७४) एप्रिल - जून १९९८ : सर्वसाधारण आदिवासी
७५ - ७६) जुलै - डिसेंबर १९९८ : आदिवासी समाज व संस्कृती
७७) जानेवारी - मार्च १९९९ : आदिवासी व आर्थिक धोरण
७८) एप्रिल जून १९९९ : आदिवासी विकास व संस्कृती
७९ - ८०) जुलै - डिसेंबर १९९९ : बोर्डी परिसर अभ्यास
८१) जानेवारी - मार्च २००० : आदिवासी जीवन, कला व मराठी साहित्य

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80.

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन, कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण.

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्र यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यत: आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' त्रैमासिक सुरु करण्यात आले आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे. (संस्थांना फक्त 'हाकारा' चे वार्षिक सदस्यत्व मिळेल.)

मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

आजीव सभासद ५०० रुपये (फक्त व्यक्तींसाठी)

हाकारा वार्षिक सभासद ५० रुपये (व्यक्ती व संस्था दोन्ही)

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ अॅन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनी ऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

पत्रव्यवहाराचा पत्ता

रा. के. मुटाटकर, अध्यक्ष
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.

आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा.

PRINTED BY : ASSIGN SYSTEMS, PUNE 30.